
शनिवार : १२ मे १९७९
७५ पैसे

# माणूस



## जागतिक बालक वर्ष हे स्वप्नातले ? वास्तवातले ?.....

याशिवाय....

'गच्चीवरील गप्पा' -संध्याकाळचे पुणे

पृष्ठ २ वर....

साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक पन्नासावा

१२ मे १९७९

मूल्य ७५ पैसे

# लहान मुलांचा असंस्कृत वापर

बालवर्ष सर्व जगात या वर्षी साजरे होत आहे. बालकांच्या कला-गुणांचा वा चारित्रिक गुणांचा विकास करण्यास मदत करणारे कार्यक्रम ठिकठिकाणी सरकारी व गैरसरकारी स्तरावरून चालले आहेत.

विशेषत: या बालवर्षात नित्यासाठी आम्ही कोणती देणगी या बालकांना देणार आहोत ? कोणते संस्कार त्यांच्यावर करणार आहोत ? त्यांना गुराढोरांच्या गोठ्यात भरणाऱ्या शाळांऐवजी चांगल्या परिसरात नीटशा जागेत आम्ही आणणार आहोत का ? शिक्षक आपल्या या अतिसंवेदनशील व संस्कारक्षम बालविद्यार्थ्यांसमोर दारू, बिडी यांपासून तसेच घाणेरड्या शिव्यांपासून स्वत:ला दूर ठेवणार आहेत का ?

महाराष्ट्रात जिल्हा परिषदांच्या निवडणकी. विधानसभा व पार्लमेंट यांच्या निवडणुकी इतक्याच चुरशीने होतात. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात त्या होऊ घातल्या आहेत. पक्षोपपक्ष आपल्या उमेदवारांची नावे ठरवीत आहेत.

या विधानसभांच्या व पार्लमेंटच्या निवडणुकीत महाराष्ट्रात व विशेषत: विदर्भात एक अनिष्ट पायंडा पडला आहे. शाळकरी लहान मुलांना गाठायचे, त्यांना बिस्किट, पेपरमिंट वा अन्य खाऊ द्यावयाचा. आपल्या उमेदवाराच्या समर्थनार्थ त्यांना घोषणा द्यावयाला सांगायचे. कायद्याने लहान मुलांचा वापर निवडणुकीत करणे गुन्हा असताना सर्रास हा प्रकार घडतो. पोलिस व जबाबदार अधिकारी यांनी याला आळा घालण्यात तत्परता दाखविली नाही.

हा गैरकायदेशीर व्यवहार येथेच थांबला नाही. या लहान मुलांकरवी विरोधी उमेदवारांच्या आगमनप्रसंगी त्यांचे वाहनावर गोटामार करणे, त्यांच्या सभेत गोंधळ घालणे ही कामेही करवून घेण्यात आली. थोडक्यात, मुलांना आमिष-लालूच याची संवय लावून त्यांचेकडून प्रत्यक्ष गुंडगिरीचे काम करवून घेतले गेले. बालपणीच राजकीय पक्ष लहान मुलांना आपल्या सत्तास्वार्थासाठी गुंडगिरीचे धडे देत आहेत. ही त्यांना अत्यंत लाजिरवाणी व नागरिकांच्या व कायद्याच्या दृष्टीने अक्षम्य घटना आहे.

काही राजकीय पक्षांनी आपल्या मतलबासाठी विवेकाला पार झुगारून दिलेले आहे. नागरिकांनी, पालकांनी, शिक्षकांनी, समाजसेवकांनी वेळीच जागृत होऊन या गुंडगिरीच्या राजकारणाला रोखले पाहिजे. नाही तर हीच मुले उद्या शिक्षक, पालक यांच्यावरही गोटामार करतील. त्यांच्यातील सात्त्विक अंश नष्ट होऊन ते अट्टल गुन्हेगार बनतील !

या जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचे वेळी काही राजकीय पक्षांना पुन्हा तो मोह होईल. सरकारने याबाबत दक्षतापूर्वक उपाय योजायला हवेत. त्यासाठी तटस्थ नागरिकांची प्रत्येक जिल्ह्यात समिती नेमून त्यांना साधने पुरविली पाहिजेत. रेडिओ, वर्तमानपत्र व अन्य प्रचार-प्रसिद्धीच्या माध्यमातून या दुष्ट प्रवृत्तीविरुद्ध सतत दररोज प्रचार करायला पाहिजे व गुन्हेगाराला त्वरित ताब्यात घेऊन कडक शासनाची तरतूद करायला पाहिजे.

('साम्ययोग' १ मे अंकावरून)

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

□

मुखपृष्ठ : माधव फळणीकर

## देशातील तीन कोटी मुले रस्त्यावर, केरकचऱ्याच्या डब्यात

# गटारांपाशी पडलेले उष्टे अन्न खाऊन जगतात....

जगातील मुलांची संख्या जवळजवळ दोन अब्ज. त्यातील दोन-तृतीयांश मुले पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे उपाशीपोटी रहाणारी. सहासष्ट टक्के मुलांना शिक्षण मिळत नाही. जवळजवळ तेवढीच टक्केवारी अंगभर कपडा न घालता येणाऱ्या नागड्या-उघड्या मुलांची.

अशा एकूण पार्श्वभूमीवर चालू वर्ष, १९७९ साल, हे जागतिक बालकवर्ष म्हणून पाळले जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने तशी घोषणा केली आहे.

श्रीमंत आणि गरीब राष्ट्रांतील मुलांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. यूनिसेफच्या अहवालानुसार १९७१ साली पाच वर्षांखालील एक करोड तीस लाख मुले उपासमारी, सकस आहाराचा अभाव आणि वैद्यकीय उपाययोजना वेळीच न मिळाल्यामुळे मरण पावली. त्यातील एक करोड दहा लाख मुले गरीब, अविकसित देशांमधली होती. यावरून लक्षात येते की, गरीब देशांतील भांडवलशाही विकासामुळे समाजातील विषमता व निम्न वर्गाचे दारिद्र्य तेवढे वाढले आहे. मुलांवर त्याचे परिणाम त्यांच्या जन्माआधीच म्हणजे ती गर्भावस्थेत असतानाच व्हायला लागतात. दारिद्र्यात जगणाऱ्या गर्भवती स्त्रियांना जेवढा पौष्टिक आहार मिळायला पाहिजे तेवढा मिळत नाही. त्यातून मग मुले जन्म होताच मरण पावतात किंवा अशक्त, रोगी अवस्थेत जन्माला येतात. गरीब देशातील बहुसंख्य मुले ही पुरेसे 'अ' जीवनसत्त्व न मिळाल्यामुळे डोळ्यांनी अधू असतात. त्याशिवाय त्यांच्या शरीरात रक्ताचे प्रमाण कमी असते. ती डिफ्थेरिया, टिटॅनेस, मुरडा इत्यादी रोगांनी अशक्त झालेली असतात.

१९५९ साली जिनेवात झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेच्या अधिवेशनात मुलांच्या अधिकारांचे रक्षण व्हावे यासाठी एक जाहीरनामा काढण्यात आला होता. त्या जाहीरनाम्याला वीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल चालू वर्ष जागतिक बालकवर्ष म्हणून पाळले जात आहे. जिनेवाच्या जाहीरनाम्यात मुलांच्या अधिकारांसंबंधी एकूण दहा कलमे होती. १ : जन्माच्या वेळी मुलाचे नाव, राष्ट्रीयता व समान मर्यादा. २ : मुलांविषयीची आई, वडील व कुटुंबाची जबाबदारी. ३ : आरोग्याची काळजी व वैद्यकीय सेवा. ४ : सकस आहार व निवास. ५ : शिक्षण व खेळांची व्यवस्था. ६ : मनोरंजन. ७ : पालनपोषण. ८ : जाती, धर्म व भाषेची सुरक्षा. ९ : कुठल्याही प्रकारच्या शोषणापासून संरक्षण. १० : अनाथ व मंदबुद्धीच्या मुलांकडे विशेष लक्ष.

जाहीरनाम्यातील या दहा कलमांची प्रत्यक्षात अंमलबजावणी गेल्या वीस वर्षांत किती झाली? याचे उत्तर आपल्याच आजूबाजूला वावरणाऱ्या मुलांकडे नुसते पाहिले तरी मिळण्यासारखे आहे, त्यासाठी वेगळ्या आकडेवारीची तशी गरज नाही.

आजपर्यंत संयुक्त राष्ट्रसंघाच्या युनिसेफसारख्या संस्थांनी जाहीरनाम्यातील ही उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवून मुलांच्या विकासाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केल्या. या उद्दिष्टांनी प्रभावित होऊन काही देशांमध्ये मुलांसंबंधीचे काही महत्त्वाचे कायदेही झाले. असे जरी असले तरी या योजना किंवा कायदे प्रत्यक्षात फारशी उल्लेखनीय कामगिरी करू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. साधनांची कमतरता हे जरी त्याचे एक कारण असले तरी मुलांशी संबंधित बहुतेक सगळ्या प्रश्नांची मुळे इथल्या समाजव्यवस्थेत आहेत. मुलांचे श्रम विकत घेतले जाऊ नयेत यासाठी कितीही कायदे झालेले असले, कल्याणकारी योजनांची आखणी झाली असली तरी ते कायदे व योजना बऱ्याचशा कागदावरच राहिल्या. कारण सामाजिक संदर्भाकडे, शोषणव्यवस्थेकडे दुर्लक्षच केले गेले. त्यामुळे श्रीमंत व गरीब राष्ट्रांमधील निम्न वर्गाचे, शोषित वर्गाचे दारिद्र्य वाढले की मुलांना शेतात किंवा अन्य ठिकाणी मोलमजुरी करून, आपले श्रम मिळेल त्या किमतीत विकल्याशिवाय दुसरा मार्गच रहात नाही.

संयुक्त राष्ट्राचा वर दिलेला जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याला वीस वर्षे झाली. या अवधीत आपण आपल्या स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सवही साजरा केला; पण या वीस वर्षांत भारतातील पंचवीस करोड मुलांना समाज आणि लोकशाही सरकारकडून फक्त उपेक्षाच मिळाली. ३२,८०,४८० वर्ग किलोमीटर क्षेत्रफळातील ५,६०,१६९ खेडेगावांत व २,६४१ लहान-मोठ्या शहरांतील या देशाची लोकसंख्या ५४,६९,५५,९४५ इतकी. त्यातली मुलांची संख्या तेवीस करोड. हे जागतिक बालकवर्ष संपेपर्यंत ही संख्या पंचवीस करोडपर्यंत जाईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. तेवीस करोड मुलांपैकी बहुसंख्य मुलेही दारिद्र्यरेषेखाली जगणारी आहेत. दर महिन्याला एक लाख मुले तर सकस आहार न मिळाल्यामुळे मरण पावतात. एक हजारपैकी एकशेबावीस मुले जन्मानंतर एक वर्षाच्या आत मरतात. देशातील मृत्युसंख्येच्या प्रमाणावरील चाळीस टक्के मृत्यू हे पाच वर्षांखालील मुलांचे असतात. जगातील कुठल्याही देशातील मुलांच्या मृत्युसंख्येपेक्षा हे प्रमाण जास्त आहे.

जेव्हा कुठे ही रोगराई पसरते तेव्हा मुलेच जास्त प्रमाणात त्यात बळी पडतात. कारण नियमितपणे अन्न न मिळाल्यामुळे त्यांची

पृष्ठ १८ वर

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# गच्चीवरील 'मॅजेस्टिक' गप्पा

कुठल्याही मराठी पुस्तकाच्या दुकानात तुम्ही शिरलात आणि मुलांसाठी पुस्तके दाखवावयास सांगितलीत की, दुकानदार दोन पुस्तके पुढे टाकतो. तुम्ही ती पाहून म्हटले, 'जरा पुढच्या वयाची हवीत' की दुकानदार म्हणतो, 'आधी वय सांगायला काय झालं होतं?' तुमचा चेहरा पडतो. दुकानदार आणखी दोन पुस्तके तुमच्यापुढे फेकतो. ती तुम्ही नर्व्हस बोटांनी चाळत असताना त्याची नजर सारखी तुमच्याकडे असते. मधेच तो म्हणतो, 'मिस्टर! बोटं घाणेरडी नाहीत ना? तुम्ही पुस्तकही घेणार नाही आणि घाण तेवढी करून जाल! ती कोण घेईल मग?' तुम्ही या बोलण्याने तर अगदी खलास होता. रुमाल काढून बोटे पुशीत म्हणता–'छे! हो! कुठे आहेत घाण!'

वारंवार घडणाऱ्या वरच्या प्रसंगाला मूठमाती देऊन मॅजेस्टिक ग्रंथविक्रेत्यांनी मराठीत नवा जमाना सुरू केला. कुणीही यावे मांडणीतील पुस्तके पहावी, चाळावी, वाचावी. लहान असा, मोठे असा, स्त्री असा, पुरुष असा, कुणाला मज्जाव नाही. विकत घ्या, घेऊ नका, काही म्हणणे नाही. बोटं घाण आहेत की स्वच्छ आहेत, कुणी विचारणार नाही. विक्रीची ही अभिनव पद्धत मॅजेस्टिकने सुरू केली. मॅजेस्टिकने मराठी ग्रंथव्यवसायाच्या जगात आणखीही नवनवे उपक्रम आरंभ केले. त्यांनी 'ललित' नावाचे ग्रंथ प्रसार करणारे मासिक काढले. तोपर्यंत अशी मासिके थोडी होती व त्यात रुक्षपणा व जंत्री यांशिवाय काही नसे. 'ठणठणपाळ' सारखी सदरे व लेख टाकून सर्वसामान्य वाचकांत त्यांनी लेखक व ग्रंथ यांच्याविषयी कुतूहल निर्माण केले. शिवाय त्यांनी मॅजेस्टिक ग्रंथ-पुरस्कार वगैरे उपक्रम सुरू केला. ते हल्ली 'दीपावली'चा दिवाळी वार्षिक अंकही काढत आहेत.

साधारणत: आपल्याकडे असा एक नैसर्गिक नियम आहे की, मराठी ग्रंथव्यवसायातील लोकांनी त्या व्यवसायात पैसे मिळवावयाचे आणि अन्य व्यवसाय सुरू करून त्यात (अनुभव नसल्याने) घालवावयाचे. कुणी प्रकाशक चित्रपट काढतो आणि पडतो; कुणी कापडाचं दुकान काढतो, कुणी रेस खेळतो, कुणी लॉरीचा धंदा करतो व बहुशः त्या धंद्यात मार खातो. मॅजेस्टिकच्या कोठावळ्यांनी असाच एक लॉटरीच्या तिकिटांचा व्यवसाय हाती घेतला आणि निसर्गनियमाच्या विरुद्ध त्यातही यश मिळविले. नाही म्हणावयास 'अनंगरंगरतिशास्त्र' यासारख्या एखाद्या पुस्तकात त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. 'फक्त प्रौढ स्त्री-पुरुषांसाठी' अशा एक ओळीच्या जाहिरातीमुळे कर्जतच्या मुळ्यांनी त्याच्या काही आवृत्त्या खपविल्या होत्या. ते पुस्तक आता का खपू नये, याचे कारण केशवरावांच्या मागून लक्षात आले. आजच्या नाटक, चित्रपट, कथा, कादंबऱ्या आणि वग यांतून अनंगरंगाहून जास्त माहिती मिळते.

पण असे एखादे छोटे अपयश केशवराव कोठावळे यांच्या व्यावसायिक यशाला गालबोटच वाटते. एकदा मी त्यांना या यशाचे कारण विचारले. ते म्हणाले, काही विशिष्ट संख्या मला शुभ होतात. प्रत्येक उपक्रमाचे वेळी त्या संख्येचा कुठे तरी संबंध मी आणतो आणि यश मिळते. 'मॅजेस्टिक साहित्यिक गप्पा' भरविण्याचे ठरविले त्या दिवशी शुभसंख्या अग्रस्थानी असली पाहिजे. गेली सहा वर्षे हा उपक्रम यशस्वी रीतीने पार पडत आहे यंदाचे वर्ष सातवे. वसंत व्याख्यानमालेची प्रतिष्ठा हळूहळू या गप्पांना लाभत आहे.

या सातव्या वर्षीचे मॅजेस्टिक साहित्यिक जत्रा व गप्पा यांचे उद्घाटन मुंबईचे सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक श्री. माधव मनोहर यांच्या हस्ते झाले. त्यांच्या नावामागची 'प्रा.' ही उपाधी मी काढून टाकली आहे. कारण माझ्या व त्यांच्या पस्तीसएक वर्षांच्या परिचयात ते मला कधी प्राध्यापक वाटले नाहीत. अंगमेहनत करणे, साधी राहणी व सडेतोडपणा या तीन स्वभाववैशिष्ट्यांनी ते सर्वसाधारणपणे प्राध्यापकात बसू शकत नाहीत. त्यांचे 'प्रा.' मी काढून घेतले यासाठी ते रागावणार नाहीत अशी माझी खात्री आहे.

प्रदर्शनाच्या हॉलचे उद्घाटन केल्यावर गच्चीवरच्या सभेत उद्घाटनाचे भाषण करताना ते म्हणाले, 'केशवराव (कोठावळे) व बाँबे बुक डेपो यांनी ग्रंथप्रसाराची मोठी कामगिरी केली. प्रदर्शने, लेखकांच्या सह्या देणे, चर्चा यातून त्यांनी चांगला प्रसार केला.' उद्घाटनाच्या या भाषणानंतर माधव मनोहर यांची मुलाखत घेण्याच्या कार्यक्रमाला आरंभ झाला. मुलाखत घेणारे सातजण होते. शंकर सारडा हे आठवे, पत्राने हजर होते. प्रा प्र. ना. परांजपे, प्रा. भालचंद्र फडके, प्रा. वि. भा. देशपांडे, प्रा. माधव वझे, प्रा. स. शि. भावे, प्रा. विद्याधर पुंडलीक हे सहा प्राध्यापक व सातवे 'सोबत'चे संपादक ग. वा. बेहरे होते. माधव मनोहरांचे वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांतील कार्य जाणून ही मंडळी निवडली असली तरी वयाच्या दृष्टीने त्यांची निवड चुकली होती हे पुढे ध्यानात आले. खरे सांगावयाचे म्हणजे माधव मनोहरांबद्दल या लोकांना खरोखरीच फार थोडी माहिती होती. यातील एक-दोन मंडळी ठेवून बाकीची प्रौढ मंडळी आणायला हवी होती. म्हणजे ह. वि. मोटे, प्रभाकर पाध्ये, वा. ल. कुलकर्णी वगैरे 'रत्नाकर'-च्या काळापासून लिहीत असलेल्या या लेखकावर त्यामुळे अन्याय झाला. निदान स्वत: मुलाखत घेणाऱ्यांनी ही मुलाखत जमणार नाही म्हणून नकार द्यायला हवा होता; पण आज-काल मुलाखतीची कल्पना अशी आहे की, मुलाखत घेणाऱ्यास अडचणीत आणून श्रोत्यांची करमणूक करून द्यावयाची. ही कल्पना असल्याने, सांगूनही कुणी ऐकले नसते. जर वरील प्रौढ मंडळी मुलाखत घेणाऱ्यात असती तर किती तरी वेगळ्या गोष्टी ऐकावयास मिळाल्या असत्या.

माधव मनोहरांचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी आहे. मोकळ्या प्रश्नानी ते मोकळेपणाने प्रगट झाले असते मुलाखतीचा हेतू सफल झाला असता आणि स्वतः माधव मनोहरांना पन्नास वर्षांपूर्वी आपण लिखाण सुरू केले हे पुढे सांगावे लागले नसते.

ते सांगण्याचे कारण डॉ. भालचंद्र फडके यांचा प्रश्न होता. त्यांनी प्रथम माधव मनोहरांना त्यांचे संपूर्ण नाव विचारले. बहुधा त्यांना माधव मनोहर हे टोपण नाव वाटले असावे. आजची पिढी पंचांग वाचत नाही त्याचा हा परिणाम. पंचांगाचे शेवटी कोकणस्थ ब्राह्मणांच्या नामावलीत त्यांना मनोहर हे आडनाव मिळाले असते. माधव मनोहरांनी संपूर्ण नाव सांगितल्यावर, 'जे जे ते लिहितात त्यातून वाद उत्पन्न होतात,' अशी फडक्यांनी माधव मनोहर यांची ओळख करून दिली. तेव्हा माधव मनोहरांनी, आपण केवळ वाद उत्पन्न करण्यास लेखन केले हे अमान्य करून, पन्नास वर्षांपूर्वी रत्नाकर मासिकांत गाल्सवर्दी, हार्डी, शॉ यांची ओळख करून देणारे लेख लिहिले हे सांगितले. तसेच लक्ष्मीबाई टिळकांना आत्मचरित्र लिहिण्यास इतरांबरोबर आपणही कसे उद्युक्त केले व कोणताही संस्कार न करता त्याची मुद्रणप्रत कशी तयार केली याची हकीगत सांगितली.

हा सूर चांगला लागला होता. हळुहळू माधव मनोहरांचे वाङ्मयीन जीवन श्रोत्यांपुढे उलगडले गेले असते. तेवढ्यात दुसरा सनसनाटी प्रश्न आला, वाङ्मयचौर्याबद्दल. 'आपण किती वाङ्मयचौर्ये पकडली ?' माधव मनोहरांनी शेकड्यात आकडा सांगितला असं मला वाटतं. ते म्हणाले, 'तेंडुलकरांच्या नाटकांचे चौर्य बाहेर काढले तेव्हा तेंडुलकर म्हणाले, 'मी कुणाच्या कोर्टात उभं राहू इच्छित नाही.' तसे त्यांनी नंतर दोन-चार नाटकाबाबत कबुलीजबाबही दिले. त्यांचे श्रीमंत हे नाटक पिरँदेलोच्या नाटकाचे भ्रष्ट रूप आहे.' तेंडुलकरांविषयी असे सांगूनही पुढे मराठीत ज्या समर्थ नाटककारांची त्यांनी नावे घेतली त्यात कानिटकर व दुसरे तेंडुलकर होते. ते म्हणाले, 'बाकिलांच क्षजावात हे लिटल मॅन व्हॉट नॉटचे भाषांतर होते. हे उघड केल्यावर बोकील म्हणाले, 'मी त्याचे नावही ऐकले नाही. ना. ह. आपटे यांच्यावर असाच आरोप आला तेव्हा 'मला इंग्रजी येत नाही,' असे ते म्हणाले. लगोलग कुणी तरी ना. ह. यांचे इंग्रजीत लिहिलेले पत्र प्रसिद्ध केले.'

यावरून असे दिसते की, वाङ्मयचौर्याचा आरोप होताच प्रत्येक लेखक वेगळ्या तऱ्हेने उपरणे झटकून मोकळे होण्यास पहातो. यानंतर नाट्यसमीक्षेवर प्रश्नोत्तरे सुरू झाली. त्यावरून कम्युनिकेशन व एलिअनेशन हे विषय निघाले. ते मला नीटसे कळले नाहीत व तुम्हालाही कळतील असे नाही. माधव मनोहरांचे म्हणणे असे दिसले की, आजची प्रायोगिक नाटके ही प्रायोगिक नाटके नाहीतच. आधी ती भाषांतरे असतात व त्यात ती विकृत केलेली असतात. कळू नयेत अशी नाटके लिहावीत का, हा आणखी एक मुद्दा. कम्युनिकेशन नसेल तर प्रयोग फसेल. कम्युनिकेशनरहित प्रयोग हे खूळ व फॅड होण्याच्या पातळीवर आले आहे. माधव मनोहरांनी असे म्हणताच आयनेस्को वगैरेंची नावे त्यांच्यापुढे करण्यात आली.

नाटक कळावे हे माधव मनोहरांचे म्हणणे आपल्यासारख्यांना पटेल. न कळणारी नाटके करण्याचे वेड इतके वाढले आहे की, कळणारी नाटकेसुद्धा न कळणारी करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. 'भ्रमाचा भोपळा' हे किती साधे सोपे नाटक; पण रंगभूमीवर सर्वत्र वाळके भोपळे लावून ते सिंबॉलिक अतएव अनाकलनीय केल्याचा यशस्वी प्रयोग मी पाहिला. एका डायरेक्टरने नाटककारास सांगितले, 'तुम्ही काहीही लिहा हो ! आम्ही ते बरोबर वठवतो !' संहिता या लोकांना कळत नाही किंवा तीवर त्यांचा विश्वास नाही. माधव मनोहरांना ही गोष्ट भयंकर वाटावी यात नवल नाही; पण ती भयंकर वाटावी हे काही प्रश्न विचारणारांना भयंकर वाटावे हे भयंकर नाही काय ? प्रायोगिक नाटकात गाजलेल्या विजया मेहता या प्रसिद्ध नटीची तीन व्याख्याने साहित्य परिषदेत झाली. जसे एखादे नाटक संपलेले कळत नाही व प्रेक्षक बसून राहतात तसा मी, विषय अजून संपला नाही असे वाटून चौथ्या दिवशी ऐकायला गेलो. रंगभूमीवर सिंबॉलिक रंगभूषा वापरून केवढा परिणाम साधता येतो असा काही तरी विषय होता.

एलिअनेशनचा प्रश्न आला तेव्हा स. शि. भावे यांनी विचारले, 'एलिअनेशन म्हणजे काय ?' माधवरावांनी उत्तर दिले, 'ते सर्वांना ठाऊक आहे.' माधव मनोहर पुढे म्हणाले, 'रससिद्धांताचे पहा, रसनिर्मिती कुठे होते ? नाटकात, अभिनयात की प्रेक्षकात ? याचे उत्तर अजून कुणाला सांगता आले नाही. एलिअनेशनचे तेच आहे.'

□

कलेचे प्रश्न किचकट असतात हे यावरून कळते. एकदा तुम्ही नाट्यकलेची चिकित्सा करू लागलात की कसे श्लेष निघू शकतात ते पहा. १ : नाटक प्रथमपासूनच कळते. २ : नाटक आरंभीचे काही दिवस कळत नाही; पुढे कळू लागते. ३ : नाटक शेवटपर्यंत कळत नाही. ४ : नाटक सर्व कळते; पण त्यात अर्थ वाटत नाही. ५ : नाटक काही कळत नाही; पण त्यात काही तरी विशेष छपलेले वाटते. ६ : नाटकाची संहिता वाईट; पण प्रयोग चांगला होतो. ७ : नाटकाचा प्रयोग वाईट होतो; पण संहिता चांगली वाटते. ८ : नाटकात नऊ प्रेक्षक आले यावरून यश कळते. ९ : शंभर प्रयोग झाले यावरून नाटकाचा दर्जा कळतो. १० : नाटक प्रेक्षकांतून व्हावे. ११ : नाटक प्रेक्षकांपासून अलग असावे. १२ : नाटक नाटक असावे. १३ : नाटक नाटक नसावे. १४ : जीवन हेच नाटक आहे—आणखी श्लेष सांगून वाचकांचा मी जास्त घोटाळा करीत नाही. कारण मीच घोटाळ्यात पडलो आहे.

□

माझ्या लक्षात आले की, ही प्रश्न विचारणारी मंडळी माधवरावांना आधुनिकतेचे धक्के देत होती; पण हा खेळ माधव मनोहरांनी लहानपणी खेळला होता. आपण तेव्हा जे धक्के दिले ते माधव मनोहरांना आठवले असतील. प्रत्येक पिढीत हा खेळ चालायचाच. त्यांच्या वेळचा खेळ कळायला हवा म्हणूनच मी त्यांचे समकालीन लोक प्रश्न विचारण्यास हवे होते असे म्हटले. माझ्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी प्रश्न विचारले असते का, ठाऊक नाही; पण मी माधव मनोहरांना पहिला प्रश्न विचारला असता—

'माधवराव ! तुमच्या घरात शिरताच समोरच्या भिंतीवर एक काळा घोडा आणि त्याला रेलून एक नग्न स्त्री उभी आहे, अशी तसबीर आहे तो तिथे का लावली ? केव्हा लावली ? हे सांगाल काय ?'

जवळजवळ चाळीस वर्षांपूर्वी मी माधव

मनोहरांकडे जाऊ लागलो. त्याआधी ती तिथे होती व तेव्हाही ती कोरी वाटत नव्हती. आपल्या वाङ्मयीन कारकीर्दीच्या कोणत्या अवस्थेत ही तसबीर त्यांनी लावली, हा एक अभ्यासाचा विषय होईल. दारावर साधारणत: देवाची तसबीर लावतात. याऐवजी असली तसबीर तेथे लावण्यात धक्का देण्याचा हेतू होता काय ? चाळीस वर्षांपूर्वी असली तसबीर लावणे मोठे धाडसाचे होते !

मला आठवणारे आणखी काही वैशिष्टयपूर्ण प्रसंग मी त्यांना सांगावयास सांगितले असते. तो पारतंत्र्याचा काळ होता. माधवरावांसह चार बंधू एकत्र राहत, असे मला वाटते. पैकी एक भाऊ कम्युनिस्ट होता, एक हिंदुसभेचा होता, एक कॉंग्रेसचा होता. माधव मनोहर यांना पक्ष नव्हता. आज सगळे पक्ष निधर्मीपणा, समाजवाद ही तत्त्वे सांगत आहेत व निवडणुकीचा काळ सोडला तर सगळे पक्ष एकच वाटतात; पण त्या वेळी जो तो पक्ष आपली तत्त्वे घट्ट पकडून होता व त्यांचे उभे दावे होते. स्वयंपाकघरात सर्व भाऊ जेवावयास आले की त्या तीन पक्षांच्या भावात वाद सुरू होई. आवाज तर चढतच; पण वाढलेले पान फेकून, भाऊ पानावरून उठत. असा प्रकार वारंवार होऊ लागल्यावर माधवरावांनी स्वयंपाकघराबाहेर पाटी लिहून ठेवली. ' आपापले पक्ष बाहेर ठेवून यावे ' आणि वाद बंद केले !

त्या वेळीच माधवरावांच्या घरातील कपाटे पुस्तकांनी ओघळत असत. आता परिस्थिती काय आहे कुणास ठाऊक ! जमिनीवर पुस्तकांचे थर पडून त्यावरून घरात वावरावे लागत असेल. ही पुस्तके ते स्वत: विकत घेत की दुसऱ्यांची होती, हा प्रश्न विचारता आला असता, त्यांची पुस्तके वाचण्याची पद्धत विचारता आली असती. त्यांना कोणती पाच पुस्तके उत्कृष्ट वाटली हाही प्रश्न विचारता आला असता आणि त्यांच्या या नादामुळे घरात निर्माण झालेल्या प्रश्नांबद्दलही प्रश्न विचारता आले असते.

माधव मनोहरांना जिव्हाळ्याचा वाटेल असा आणखी एक प्रश्न विचारता आला असता. त्यांच्या चिरूटाबद्दल. त्यांच्या त्या चिरूटाने मला एकदा दगा दिला. ते परळ दामोदर हॉलमध्ये होणाऱ्या स्पर्धेत परीक्षक होते. त्यांनी मला एक नाटक पहायला बोलावले. रात्री एक वाजता नाटक संपल्यावर ते दादरला गेले व मी स्टेशनवर आलो. त्या वेळी मी सिगारेट ओढीत असे. माधव मनोहरांनी मला, चिरूट ओढून पहा म्हटले व एक छोटा चिरूट दिला. कल्याण लोकलमध्ये बसल्यावर दादर सुटताच मी चिरूट शिलगावून दोन झुरके घेतले आणि मला चक्कर आली ती ठाणेस्टेशन आल्यावर मी भानावर आलो !

माझ्या लिखाणाचा सुरुवातीचा तो काळ होता. गोड काळ होता म्हणून आठवणी आठवीत आहे. मी तेव्हा जे गुरू केले त्यात माधव मनोहर होते. लेखनक्षेत्रात पुष्कळांजवळून शिकावे लागते. माधवराव इतरही पुष्कळ गोष्टी शिकवीत. कुणाला पोहावयास शिकावयाचे असेल तर त्यांनी माधवरावांकडे जावे असे होते. कुणाला डोंगरावरून ट्रेकिंग शिकावयाचे असेल तर माधवरावांसारखा उत्साही शिक्षक नव्हता ! खरे म्हणजे पोहोण्यास शिकवणे--ट्रेकिंग याबद्दल इथे प्रश्न विचारण्यास हवे होते. त्यांनी आनंदाने उत्तरे दिली असती. तसेच माधव मनोहरांनी कित्येक लेखकांना प्रोत्साहन दिले, लिहिते केले आणि शेकडो, हजारो म्हणा, हस्तलिखिते वाचून आपली मते दिली, त्याबद्दलही प्रश्न हवा होता. आजच्या जाणकारांना हस्तलिखित वाचावयास दिले तर वर्षभर पडून राहील, पुष्कळदा ते हरवेल. हल्ली पैसे मिळतात तीच कामे आधी केली जातात. हे योग्यच, पण माधव मनोहर लक्षाधीश नव्हते; पोटाला चिमटा घेऊन ते हस्तलिखिते वाचीत होते. वाङ्मयचौर्याबद्दल प्रश्न विचारणारांनी प्रश्न विचारले, ते याबद्दल विचारायला हवे होते. त्यामुळे श्रोत्यांची करमणूक झाली नसती; पण काही बरं ऐकायला मिळाले असते.

मी त्या काळात माधव मनोहरांकडे एक दिवसाआड जात असे. आमच्या काय गप्पा होत आठवत नाही. त्यांच्याशी गप्पा मारण्याइतके माझ्याजवळ ज्ञान नव्हते हे नक्की ! ते मला कधी घरी तर कधी शिवाजीपार्कच्या चौपाटीवरील एका इराणी हॉटेलात चहा देत. त्या वेळी मुंबईत गर्दी नव्हती. समुद्रकाठ स्वच्छ होता आणि हे हॉटेलही मोठे रोमॅंटिक होते. नारळांच्या झाडात त्याची खोपटीवजा इमारत होती. अंगणात जरा जीर्ण अशा वेताच्या खुर्च्या टाकलेल्या असत. त्या खुर्च्यांत बसून आम्ही हळहळू चहाचे घोट घेत अर्धा तास तरी बसत असू. त्यांच्या घरचा शेकडो कप चहा मी रिचवला असेल आणि त्यांना (आजच्या भाषेत) भरपूर बोअरही केलं असेल; पण त्यांनी कधी आतल्या खोलीत लपून घरात नसल्याचा निरोप ठेवला नाही. अधूनमधून ते मला एखादे पुस्तक वाचावयास देत. मी हेमिंग्वेसारखे लिहितो असे ते म्हणत. त्या वेळी


# क्रांतिवीर बाबाराव सावरकर

## पुस्तकांचे पुन:प्रकाशन

दि. १३ जून १९७९ ला कै. क्रांतिवीर गणेश दामोदर तथा बाबाराव सावरकर यांची जन्मशताब्दी आहे. जन्मशताब्दीच्या या वर्षात कै. बाबाराव सावरकरलिखित पुढील दुर्मिळ पुस्तकांचे पुन:प्रकाशन करण्याची योजना आहे.

**१. राष्ट्रमीमांसा] २. हिंदुराष्ट्र – पूर्वी – आता – पुढे ३. श्रीशिवरायांची आग्र्यावरील गरुडझेप ४. वीरा – रत्न – मंजूषा ५. धर्म हवा कशाला ६. ख्रिस्तपरिचय अथवा ख्रिस्तांचे हिंदुत्व ७. वीर बंदा बैरागी.**

उपरोक्त पुस्तकांच्या काही प्रती पुन:प्रकाशनासाठी पाहिजे आहेत. आपल्याजवळ वरील पुस्तकांपैकी जी पुस्तके असतील ती खालील पत्त्यावर रजिस्टर्ड टपालाने कृपया लगेच पाठवावीत. पुस्तकाचे मूल्य ( टपालव्ययासह ) देण्यात येईल आणि प्रकाशित झाल्यावर नव्या आवृत्तीची नवी प्रत भेट म्हणून पाठविली जाईल.

**विक्रम सावरकर**

**सुभाष कुंज, धर्मवीर डॉ. मुंजे मार्ग, सीताबर्डी, नागपूर–४४००१२**

हेमिंग्वे कोण आहे याची मला कल्पना नव्हती; पण जरा बरे लिहिणारा मुलगा असला की त्याला गॉर्की, चेकाव्ह, मॉम, टॉयस्टायसारखा म्हणून उत्तेजन द्यावयाची त्या वेळी पद्धत होती.

अनेकदा मी त्यांच्या हातातील कामात व्यत्यय आणले. तरुण लेखकांना मदत करण्याच्या उत्साहाची तेव्हा टिंगलही झाली. 'अभिरुची'च्या एका अंकात त्यांच्यावर गोष्ट लिहून शामराव ओक किंवा वि. मा. दि. पटवर्धन यांनी ती टिंगल केली. माधव मनोहरांना मुसलमानी नाव देऊन निजामाच्या दरबारात सरदार केले होते. शहरात आलेल्या प्रत्येक नव्या कलावंताला या सरदाराचा आश्रय असे. अशा एका कलावंताचे खूप कौतुक त्या सरदाराने करून लग्नही जुळविले. फक्त लग्नाच्या पहिल्या रात्रभर कलेच्या गप्पा मारीत त्याला रंगमहालाच्या बाहेर ठेवले. अशी ती गोष्ट होती.


ही गोष्ट माधव मनोहरांच्या औदार्यावर व मोकळेपणावर अन्याय करणारी होती. श्री. ना. पेंडसे यांच्याबाबतीत असाच एक अन्यायाचा प्रकार घडला. पेंडसे यांचे पहिले लिखाण माधव मनोहर यांनीच वाचले; सुधारले. त्यांच्या एका कथेवरून त्यांनी कादंबरी लिहावी अशी कल्पनाही माधव मनोहरांनी सुचविली. त्या दिवसांत माधव मनोहरांकडे त्यांची रोज खेप असे. कथेवरून केलेली ती त्यांची कादंबरी 'गारंबीचा बापू' होती. तिच्या प्रस्तावनेत पेंडशांनी माधव मनोहरांचे खूप आभार मानले; पण त्या कादंबरीची दुसरी आवृत्ती निघाल्यावर आपल्यावरच्या आभाराच्या ओळी काढून टाकल्याचे माधव मनोहर यांच्या लक्षात आले. त्यांना फार वाईट वाटले. माधव मनोहरांनीच मला हा प्रसंग सांगितला.

हे लिहिताना मी भारावून गेलो आहे. त्या काळी नव्या लेखकांना माधव मनोहरांनी केलेल्या त्या सहाय्यांची जंत्रीही करता येणार नाही. कारण त्यातले जे माझ्यासारखे लेखक पुढे आले त्यांना आता पर्वा नाही व जे पुढे येऊ शकले नाहीत त्यांना उत्साह नाही. माधव मनोहरांच्या साधेपणामुळं त्यांच्याकडे जायला माझ्यासारखे दबकत नसत. मी जे गुरू केले ते माधव मनोहर यांच्यासारखे साधे होते. प्रभाकर पाध्ये, पं. वि. बावडेकर, र. गो. सरदेसाई. मला वाटते या मुलाखतीला जर माधव मनोहरांच्या पत्नी सौ. काशीताई यांना बोलावले असते तर नव्या लेखकांना प्रोत्साहन देण्याच्या 'वेडाने' घरात किती त्रास झाला हे कळले असते. कम्युनिकेशन आणि (तो दुसरा शब्द कोणता ?) या शब्दांचा छल करीत बसण्यापेक्षा आणखी एक प्रश्न होता— माधव मनोहरांनी मध्ये दहाएक वर्षे विसावा घेतल्यासारखी काढली असे मला वाटते. त्यांचे नाव तेव्हा फारसे कुठे कानावर येत नव्हते. त्या काळाबद्दलही त्यांना विचारता आले असते.

◻

असो. या निमित्ताने माझ्याही काही आठवणींना उजळा मिळाला. या आठवणी माधव मनोहरांना कदाचित तापदायक होतील; पण त्या निमित्ताने मी माझे अत्यंत सुखाचे दिवस पुन्हा जगलो. आता मॅजेस्टिकच्या हॉलमधे मी इतर साहित्यिक, प्रकाशक, संपादक यांजबरोबर लिंबू-सरबत घेत लोडाला टेकून बसलो असता मला शेतावर हुरडा खाण्यास जावे तसे वाटत आहे. तेव्हा शेतकऱ्याने पसरून दिलेल्या घोंगडीवर बसून, त्याने हात भाजत, कुस्करून दिलेला हुरडा आपण खात असतो. शेत लावण्याचे वगैरे कष्ट आपल्याला पडलेले नसतात, त्यामुळे हुरड्याचा आनंद द्विगुणित असतो. आता तशीच या लोडाला टेकून वर गच्चीवरची मुलाखत स्पीकरमधून ऐकत असताना केशवराव कोठावळे व त्यांचे सहकारी यांचे कष्ट नजरेआड करून मी सुखात पहुडलो आहे.

◻



हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.
( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

—डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# मुक्ताफळे

ग्यानबा

## □ दिसला हो बाई दिसला !

तुम्हाला दिसला नाही. आम्हाला दिसला नाही; पण दिसायचा त्यांना दिसला बरं. कुठं दिसला? कसा दिसला? या 'बाई' कोण? सगळे प्रश्न असे पाठोपाठ शिंका आल्यासारखे विचारू नका एक एक विचारा! त्यांना हात दिसला हात. हात्तिच्या! हात्तिच्या काय-हा हात साधासुधा नाही. हा हात भयंकर आहे! हा हात खून पाडतो, घरे जाळतो. असा हा भयंकर हात, नेहमीप्रमाणे मधु लिमयांना दिसला! सर्वांच्या आधी त्यांनी त्याला पाहिला! ते ओरडत उठले,

'दिसला हो बाई दिसला!'

आणि बाई खिडकीपाशी धावत आल्या. आता या बाई कोण? सांगतो. सगळे संगतवार सांगतो.

आता कुणाला दिसत नाही असा हा भयंकर हात, मधु लिमयांनाच का दिसावा बुवा? हे भास त्यांनाच का होतात? कारण एकच. नामस्मरण! अखंड नामस्मरण! अखंड नामस्मरणाचा हा परिणाम आहे. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी अध्यात्मशक्तीचा झरा गुप्तपणे वाहात असतो. त्याला कुंडलिनी म्हणतात. नामस्मरणानं कुंडलिनी जागी होते. नामस्मरण वाढू लागलं की मनोलय होतो. याची पुढची पायरी म्हणजे अवस्थालय. या अवस्थेत डोळे मिटले रे मिटले की, पीतवर्ण दिसतो. हा बुद्धीचा रंग. यात थोडा मत्सर-संतापाचा लालपणा मिसळला, की भगवा रंग होतो. आता जागृती स्वप्न-सुषुप्ती याच्या पलीकडे माणूस गेला असं समजावं. आता त्याला काय दिसेल हे सांगता येत नाही. मूळ नामस्मरण काय चालवलं होतं यावर सगळं अवलंबून! माणसाच्या शरीरांतर्गत शक्ती बेंबीपाशी रहातात, म्हणून बेंबीच्या देठापासून होणारं नामस्मरण शुद्ध रूप धारण करतं. मधु लिमये यांचा नाममंत्र आहे संघ-जनसंघ! यातच मनोलय होऊन ते अवस्थालयात झपाट्यानं शिरतात आणि मग त्यांना तो भयानक 'हात' दिसू लागतो. कुठं दंगल झाली रे झाली की मधु लिमये, सुभद्रा जोशी आणि सेक्युलर सोसायटीचे अध्वर्यु नामस्मरणाचा धडाका लावतात. मंडळींचा अवस्थालय होताच सर्व ओरडू लागतात-'दिसला हो बाई दिसला!' त्यांना हात दिसतो. भयंकर हात! दंगलीमागचा हात! खून पाडणारा हात! जाळपोळ करणारा हात...

जमशेदपूरला नुकतीच जातीय दंगल झाली. हाहा:कार उडाला. ११६ जण बळी पडले. ३५० जण जखमी झाले. ४०० हून अधिक घरं जाळण्यात आली. ५० ठिकाणी गोळीबार केला तेव्हा दंगल शमली!

दंगल का झाली? सुरुवात कशी झाली? कुणी केली? हे तुम्हाआम्हाला ठाऊक नाही. कारण आपण साधी संसारी माणसं. आपल्याला नामस्मरणाचा छंद नाही. रॉकेल कसं मिळेल? गॅसला नंबर केव्हा लागेल? साखरेचे भाव खाली येणारच नाहीत का? अशा क्षुद्र विवंचना आपल्या पाठीशी असल्यानं, कुठं दंगल होऊन माणसं मेली की आपल्याला फक्त वाईट वाटतं. शहराशहरातून निरपराधांना भोसकीत सुटणाऱ्या गुंडांना कडक शासन व्हावं, असं आपल्या मनात येतं. इतके खून पडून, सर्व खुनी पुन: पुढच्या दंगलीसाठी सुरे पाजळीत समाजात जिवंत रहातात-कुणी फाशी जात नाही, त्यामुळं मन उदास होतं. आपण वाट पहातो की दंगलीचे खरंखुरं वृत्त लवकरच कळेल; पण नामस्मरण करणाऱ्यांचं तसं नाही. पहाता पहाता ते अवस्थालय होऊन सांगू लागले-'दिसला! दंगलीमागचा हात दिसला!' ११ एप्रिल ते १५ एप्रिल जमशेदपूरला दंगल चालू होती. तोच १७ एप्रिलला हात दिसलासुद्धा! भोपाळला युवा-जनताच्या अधिवेशनात मधु लिमयांनी ओरडा केला-

'जमशेदपूर दंगलीमागं संघाचा हात आहे!'

गेल्या नोव्हेंबरात ५-६ तारखांना अलिगढला दंगल झाली. १५ नोव्हेंबरला उज्जैनला युवा जनताचा जो राष्ट्रीय मेळावा झाला, त्यात मधु लिमयांसह सर्व भक्तांना हाच हात दिसला! अलिगढला नंतर पत्रकार गेले. त्यांपैकी टाइम्सच्या पत्रकारानं माहिती दिली-

'फझदअल्ली आणि मिर्झा लद्दन या दोन अलिगढमध्ये बाहेरून आलेल्या मुसलमान गुंडांची पैशावरून बाचाबाची झाली. मिर्झानं फझदच्या पोटात सुरा भोसकला. कोथळा बाहेर आलेला फझद इस्रायली मुसलमानांच्या वस्तीत शिरला. यांचे अन्सारी मुसलमानांशी वैर होते. इस्रायली मुसलमानांना वाटले, अन्सारी मुसलमानांनी जुनं वैर सुरू केलेलं दिसतं. सुरा भोसकणारा मिर्झा, सराफबाजारात शिरला तिथं हिंदूंची वस्ती अधिक. तिथल्या हिंदूंना वाटलं हातात रक्तानं माखलेला सुरा घेऊन धावणारा मिर्झा हिंदूंना भोसकीत सुटला आहे. फझद गेला तिथले मुसलमान आणि मिर्झा शिरला त्या वस्तीतले हिंदू यांच्यात दंगल उसळली ...वगैरे'

देवरसांनी संघाची दारं मुसलमानांना उघडी केल्यावर, फझद आणि मिर्झा हे संघात जाऊ लागले असावेत. नाही तर या दंगलीमागचा 'हात' कुणाचा आहे हे कसं काय आढळणार होतं हो! जनता पक्षानं श्री. अब्बास अली यांच्या नेतृत्वाखाली एक त्रिसदस्य समिती नेमली या समितीनं अलिगढ दंगलीची चौकशी करून सांगितलं,

'या दंगलीमागं संघाचा हात मुळीच नाही!' म्हणून मग मधु लिमयांच्या भक्तांनी दिलगिरी प्रदर्शित केली की काय? त्यांना उन्मनी अवस्थेत जो हात नक्की दिसला त्याचं काय? त्यांच्या महाराजांची त्यांना तशी शिकवणच आहे. हात दिसला म्हणजे दिसला. नंतर खुलासा वगैरे करायचा नसतो. आमदार प्रा. ग. प्र. प्रधान मधु लिमयांविषयी दैनिक सकाळमध्ये एक पत्र लिहिते झाले (जुलै १९७८). या पत्रात ते लिहितात-

'जनता पक्षाच्या दिल्ली येथील बैठकीचे जे वृत्त आहे (सकाळ १२ जुलै) त्यात पुढील मजकूर आहे: श्री. रामधन म्हणाले-"अमेरिकेहून परत आल्यावर मधु लिमये मला म्हणाले की, 'जनसंघ एक नंबरचा शत्रू असताना, तुम्ही बी. एल. डी. शी कशाला भांडत आहात?" माझी व मधु लिमये यांची

आज (१३ जुलै) गाठ पडली तेव्हा मी त्यांना विचारले...'श्री. रामधन बैठकीत असे बोलले हे तरी खरे का?' त्यावर त्यांनी होकारार्थी उत्तर दिल्यावर मी पुढे विचारले, 'हे विधान खोडसाळपणाचे आहे असे तुम्ही लगेच का म्हणाला नाहीत?' श्री. मधु लिमये म्हणाले, 'प्रत्येक प्रश्नाबाबत खुलासा–प्रतिखुलासा करणे कसे शक्य आहे?'

तर ही लिमयेमहाराजांची शिष्यांना शिकवणच आहे. खुलासा करणे शक्य नसतंच मुळी. राम नरेश यादवांवर खुनी हल्ला झाला. त्या वेळी देखील महाराजांच्या अनुयानांना स्पष्टपणे 'संघाचा हात' दिसला होता. पुढे पोलिस म्हणाले 'नाही हो! पकडलेला माणूस संघाचा नाहीच मुळी!' म्हणून काय लगेच हात दिसलेल्यांनी खुलासा करून दिलगिरी प्रदर्शित करायची की काय? खुलासा–प्रतिखुलासा करायला वेळ कुणाला आहे? नामस्मरणात असा खुलाशांचा व्यत्यय चालत नाही!

आता जमशेदपूर दंगलीबाबत अगदी सविस्तर वृत्त महाराष्ट्र टाइम्सने प्रसिद्ध केले आहे. यांत पुढील उद्‌बोधक माहिती सापडते–

'भोसकाभोसकीत ९३ ठार झाले. यात ३२ हिंदू आणि ६४ मुसलमान आहेत. गोळीबारात २० ठार झाले. त्यात १२ हिंदू आणि ८ मुसलमान आहेत. ३७५ जखमीत १८७ हिंदू आणि १८७ मुसलमान आहेत.' आता हे सर्व वाचताना आम्हाला १९३६ चा काळ आठवला. तेव्हा मुंबईत जातीय दंगल झाली की नवाकाळ, लोकमान्य सारखी वृत्तपत्रे हेडलाइन देत 'दंगलीचा २१ वा दिवस' १२ हिंदू ठार २ मुसलमान ठार!' अशा रीतीने निरपराध मृतांचा जातवार उल्लेख करण्यावर पुढे बंदी आली. सुसंस्कृत वृत्तपत्रनीतीला हे धरूनच झाले. जवळजवळ सर्व वृत्तपत्रे हा दंडक पाळतात; पण १९७९ सालात मुंबईचे हे पुरोगामी वृत्तपत्र ही जातवार का बरे देते? ते असो. मुद्दा आहे तो दुसराच. या वृत्तात दंगल कशी सुरू झाली याचे वर्णन आहे–

'रामनवमीनिमित्त निघालेल्या प्रचंड मिरवणुकीवर मुस्लिम भागातून बाँब फेकण्यात आला व दगडही भिरकावण्यात आले!'

हे हात कुणाचे होते? जमशेदपूरमधले बरेच मुसलमान देवरसांच्या संघात जाऊ लागलेले दिसतात. त्याशिवाय मधु लिमयांना दंगलीमागचा हात ओळखता कसा आला?

आता रामनवमीच्या या मिरवणुकीत काही जनसंघीय आमदार होते, असे तारा पंडित यांनी 'माणूस' मध्येच लिहिले आहे. आम्हाला ही फारच गंभीर बाब वाटते. हे एक दोन लोक लाखाच्या मिरवणुकीत नसते तर बॉम्ब कशाला फेकला गेला असता? यावर उत्तम उपाय म्हणजे यापुढे जनसंघी आमदार–खासदारानी फक्त ताबुताच्या मिरवणुकीतच सहभागी व्हावे. त्यांना इतर कुठल्याही मिरवणुकीत जायला सरकारने कायदेशीर बंदी करावी! हे लोक रामनवमीच्या मिरवणुकीत सामील होतात म्हणजे काय? जातीय कुठले! आणि कुठल्याही रस्त्याने सवाद्य मिरवणूक नेण्याचा हक्क, अगदी सुप्रीम कोर्टाने मान्य केला असला तरी तो पुनः पुनः सिद्ध कशाला करायला हवा? हक्क आहेच. तो वापरला नाही म्हणजे झाले!

हे हात दिसण्याचं कधी थांबेल का? नजिकच्या काळात थांबेलसं वाटत नाही. दहा वर्षांपूर्वी १९६९ साली अहमदाबादला दंगा झाला. इंडियन एक्प्रेसचे वार्ताहर नंदन कागल यांनी हकिगत लिहिली–

'अहमदाबाद येथे जे घडले ते सांगणे कटु आहे परंतु कुणाची पत्रास न ठेवता सांगितले पाहिजे. ज्या कृष्णकृत्यामुळे अहमदाबादेत हजारावर माणसे मरण पावली, ती ठिणगी मुसलमान जात्यंधांनी मूर्खपणाने टाकली आहे. जगन्नाथमंदिरावर त्यांनी केलेला भीषण हल्ला, मंदिरात आणि मंदिराबाहेर त्यांनी पुजाऱ्यांना केलेली मारहाण, ही या दंगलीला जबाबदार आहे. दंगलीत अखेर मुसलमानांची हत्या जास्त झाली असे सांगून मुसलमानांची आगळिक लपवता येणार नाही. मुसलमान जास्त मेले. मरणारच! यापुढे नेहमीच जास्त संख्येने मरणार! कारण या देशात हिंदू बहुसंख्य आहेत!'

या वेळी इंडियन सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष अ. भि. शहा यांनी इंडियन एक्सप्रेसमधे पत्र लिहिले–

'आमच्या मुसलमान नागरिक बांधवांशी, अहमदाबादचे हिंदू ज्या पद्धतीने वागले त्याची त्यांना शरम वाटली पाहिजे!'

आमचे त्या वेळीही नेमके हेच मत होते. शरम वाटली पाहिजे हिंदूंना. जगन्नाथमंदिरावर हल्ला करणाऱ्यांना नाही. जगन्नाथमंदिर ते काय? ते पुजारी कसले बूर्झ्वा...! हिंदूंनाच शरम वाटायला हवी. आता दहा वर्षं झाली. या दीर्घ प्रवासात मुसलमान काही नवं शिकले का? त्यांची मनं अजून औरंगजेबाच्या काळात आहेत. आपल्या दृष्टीनं औरंगजेब मरून ३०० वर्षं झाली. आता आपण तो कसा महापुरुष होता, हे दाखवणाऱ्या कादंबऱ्या वाचतो. एखादा सेतुमाधवराव पगडी बोंबलतो, 'अरे, औरंगजेब असा नव्हता. त्याने पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराची मोडतोड केली: मुद्दाम मंदिरात गाई कापल्या! हा बघा त्याचा हुकुमनामा!' चूप! इतिहास सांगतोय जुनापुराणा– अ. भि. शहांच्या आणि मधु लिमयांच्या काळात!

परंतु औरंगजेबाच्या काळात मनानं वावरणारी माणसं भारताच्या सरहद्दीवर क्रूर इस्लामी राजवटी निर्माण करीत असताना भारतातील मुसलमानांनी रामनवमीच्या मिरवणुकीवर फेकले चार बॉम्ब, मारले काही दगड, तर त्यात असं काय मोठं बिघडलं!

शहेनशहाच्या काळात अजून रममाण झालेली मनं काही हिंदू दैवतांवर हल्ला करण्याचा आपला ऐतिहासिक छंद सोडण्याचं चिन्ह नाही. यापुढेही त्यामुळं दंगली होणार आणि दंगल झाली रे झाली की, संघ–जनसंघाच्या अखंड नामस्मरणानं विलयावस्थेत गेलेले मधु लिमये ओरडत उठणार–

'दिसला हो बाई दिसला!'

आणि बाई त्याला कौतुकानं म्हणणार–

'ठेव रे विश्वास थोडा, श्वास घेऊ दे मला
तापलेली रे तनू ही, 'पक्ष' बांधू दे मला
मी न आता राहिल्ये रे पूर्वीची ती चंचळा
पोक्त मी झाले अता रे डाव खेळू वेगळा
एक ऐसा डाव मांडू, 'संघ' मोडू आतला
तापलेली रे तनू ही: पक्ष बांधू दे मला॥'

आता ओळखा या बाई कोण?

# ब्रिटिश निवडणुका

## श्रीमती थॅचर यांची 'नवी दिशा'

वा. दा. रानडे

ब्रिटिश निवडणुकांत श्रीमती मार्गारेट थॅचर यांच्या नेतृत्वाखालील हुजूर पक्षाने निर्णायक बहुमत मिळविले आणि ब्रिटनच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान श्रीमती थॅचर यांनी मिळविला, हुजूर पक्षाचा विजय अनपेक्षित नव्हता; पण फार अल्प बहुमताने तो निवडून येईल असे निरीक्षकांचे अंदाज होते ते मात्र चुकले. हुजुरांनी ६३५ पैकी ३३९ म्हणजे बहुमतापेक्षा २१ जागा अधिक मिळविल्या असून मजूर पक्षावर ७१ जागांची आघाडी मिळविली आहे. अल्प बहुमत नसल्याने मंत्रिमंडळ पाच वर्षे स्थिर कारभार देऊ शकेल.

पूर्वीच्या निवडणुकांशी तुलना केल्यावर निवडणूक-निकालांची अधिक यथार्थ कल्पना येईल. दुसऱ्या महायुद्धानंतरची ही अकरावी निवडणूक. हुजुरांना या वेळी मिळालेल्या ३३९ जागा या काही गेल्या अकरा निवडणुकांत त्यांना मिळालेल्या सर्वांत जास्त जागा नव्हेत. यापूर्वी सर्वांत जास्त ३६५ जागा त्यांनी १९५९ च्या निवडणुकीत आणि त्याखालोखाल ३४५ जागा १९५५ च्या निवडणुकीत जिंकल्या होत्या; पण या वेळचे वैशिष्टय म्हणजे गेल्या दोन निवडणुकांतील घसरगुंडी त्यांनी सावरली. एवढेच नव्हे तर आपल्या जागा वाढवून बहुमत मिळविले. एडवर्ड हीथ यांच्या नेतृत्वाखाली १९७० ची निवडणूक हुजूर पक्षाने जिंकली होती त्या वेळी त्यास ३३० जागा मिळाल्या. त्यानंतर फेब्रुवारी १९७४ च्या निवडणुकांत २९६ ( म्हणजे ३४ ची घट ) आणि ऑक्टोबर १९७४ च्या निवडणुकांत २७६ जागा ( म्हणजे आणखी वीसची घट ) असे पक्षबळ घटले होते. या वेळी ऑक्टोबर १९७४ पेक्षा ६३ अधिक जागा हुजुरांनी जिंकल्या. १९७० मध्ये हीथ यांनी मिळविलेल्या विजयापेक्षाही हा विजय मोठा आहे.

मजूर पक्षाच्या दृष्टीने विचार करावयाचा तर त्यांना मिळालेल्या २६८ जागा गेल्या सहा निवडणुकांत सर्वांत कमी आहेत. त्यापूर्वी १९५९ मध्ये यापेक्षा कमी म्हणजे २५८ जागा मजूर पक्षास मिळाल्या होत्या. कॅलाहन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पहिल्याच निवडणुका. त्यातील अपयशाला मुख्यत: तेच जबाबदार धरले जातील आणि नेतृत्वात बदल होण्याचीही शक्यता आहे.

हुजूर किंवा मजूर यापैकी कोणत्याच पक्षास निर्णायक बहुमत मिळणार आणि सरकार बनविण्यासाठी त्यांना आपल्या पाठिंब्यावर विसंबून रहावे लागेल अशी आशा लिबरल पक्षास वाटत होती; पण निकालांनी ती फोल ठरविली. स्थिर सरकार राहण्याच्या दृष्टीने मतदारांनी हुजूर पक्षास निर्णायक बहुमताने निवडून दिले. लिबरल पक्षाने १९७० च्या निवडणुकीत फक्त ६ जागा मिळविल्या होत्या त्यानंतर फेब्रुवारी १९७४ च्या निवडणुकीत हे बळ १३ पर्यंत वाढले. ऑक्टोबर १९७४ च्या निवडणुकीतही पक्षाने ते कायम राखले; पण त्याच्या मतांचे प्रमाण एक टक्क्याने घटले होते. या वेळच्या निवडणुकीत जागांची संख्या दोनने घटली. (मतांचे आकडे लेख लिहीपर्यंत उपलब्ध झाले नव्हते; पण त्यातही घट झाली असावी.) आपल्याला मतांच्या प्रमाणात जागा मिळत नाहीत, त्यासाठी सध्याची निवडणूकपद्धती बदलून मतांच्या प्रमाणात जागा देणारी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती स्वीकारावी अशी मागणी लिबरल पक्ष करीत आला आहे; पण ती मान्य झालेली नाही. कारण हुजूर व मजूर या दोन्ही मोठ्या पक्षांना सध्याची पद्धतीच सोयीची वाटते.

छोट्या पक्षांमध्ये स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टी हा लिबरल पक्षाच्या खालोखाल दुसरा प्रभावी गट. ऑक्टोबर १९७४ च्या निवडणुकांत त्याने ११ जागा मिळविल्या होत्या; पण या वेळी त्याचे बळ घटून त्यास फक्त २ जागा मिळाल्या. वेल्श नॅशनॅलिस्ट पक्षालाही फक्त दोनच जागा मिळाल्या. इतर छोटे पक्ष व अपक्ष यांना १३ जागा मिळाल्या आहेत. हुजूर पक्षास निर्णायक बहुमत मिळाल्याने छोट्या पक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून राहण्याची गरज राहिलेली नाही.

देशाला आपण नवी दिशा दाखवू असे श्रीमती थॅचर आपल्या निवडणूक-प्रचाराच्या भाषणातून म्हणाल्या होत्या. ही नवी दिशा कोणती असेल ? कर कमी करण्याचे आश्वासन त्यांनी दिलेले आहेच. राजकारणावरील कामगारसंघटनांचा प्रभाव कमी करण्याचा त्यांचा निर्धार आहे; पण हे साधणे सोपे नाही. पूर्वीचे हुजूर पंतप्रधान हीथ यांनी याच धोरणाचा खंबीरपणाने पुरस्कार केला होता. ब्रिटनमध्ये संपांची लाट सुरू झाली. खाणी-कामगारांचा संप दीर्घ काळ चालू होता. त्यांच्या मागण्यांपुढे नमण्याचे हीथ यांनी नाकारले व या प्रश्नावर निवडणुका घेतल्या; पण त्यांना त्या गमवाव्या लागल्या. याबाबतीत फार ताठर धोरण स्वीकारल्यास श्रीमती थॅचर यांच्यावरही तोच प्रसंग येण्याचा संभव आहे.

हुजूर आणि मजूर यांच्या परराष्ट्र-धोरणात फारसा फरक नाही; पण भारताच्या दृष्टीने आशियावासींसंबंधीचे धोरण व आफ्रिकेच्या दृष्टीने ऱ्होडेशिया-संबंधीचे धोरण महत्त्वाचे ठरेल. आशियावासींनी ब्रिटनमध्ये स्थायिक होण्यावर आम्ही कडक निर्बंध घालणार आहोत, असे श्रीमती थॅचर यांनी सूचित केले. ऱ्होडेशियात यूनोचा आदेश डावलून स्मिथ यांनी काळ्या नेत्यांशी केलेल्या अंतर्गत समझोत्यानुसार निवडणुका घेतल्या. त्यात बिशप मुझोरेवा यांच्या नेतृत्वाखालील पक्षास बहुमत मिळाले व ते पंतप्रधान झाले त्यांच्या सरकारला ब्रिटन मान्यता देईल का ? यूनोच्या सुरक्षा-समितीने या निवडणुका रद्द ठरविल्या आहेत; पण ब्रिटन—अमेरिका या ठरावावर तटस्थ राहिले त्या अर्थी हा ठराव त्यांना मान्य नाही. ब्रिटनने मुझोरेवा सरकारला मान्यता दिली तर आफ्रिकन राष्ट्रांत त्याची तीव्र प्रतिक्रिया होईल. याबाबतीत अमेरिकेने ब्रिटनला पाठिंबा दिला तर अमेरिकेवरही या राष्ट्रांचा रोष होईल. ऱ्होडेशियात इंग्लंडला खरी लोकशाही हवी आहे की नाही याची कसोटी या निर्णयाने लागणार आहे. □

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## भविष्याकडे नजर ठेवून

बंगाल सुंदर आहे, हिरवागार आहे, इथे ओला ओला थबथबलेला निसर्ग आहे; पण अशा ह्या बंगालची राणी, कलकत्ता-नगरी, तिची मात्र शोचनीय दशा आहे. तिच्या चेहऱ्यावर व्रणांप्रमाणे ठिकठिकाणी खड्डे आहेत आणि खड्ड्यांच्या बाजूलाच मातीचे ढीग. याचं कारण ट्यूबरेल्वे व तिच्या अनुषंगाने ड्रेनेजचं काम एकदमच सुरू झालेलं आहे. ह्या नगरीला सुंदर करण्यासाठी अगोदर विद्रूप बनविणं भाग आहे. मात्र ह्या खड्ड्यांमधून बाहेर काढलेले मातीचे ढीग पाहिले की, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ह्या मातीत कुठे दगड म्हणून नाही. नुसती मातीची ढेकळं. केवळ चिखल, तोही अगदी नरम ! काही काही ठिकाणी ह्या मातीच्या ढिगांनी टेकडीएवढा आकार घेतलेला आहे आणि तो वाळत असता त्यावर आपोआप वनस्पती उगवली आहे. हे दृश्य मात्र क्षणभर नजरेला सुखावून जातं.

शहरातील ह्या सर्व खोदकामामुळे सामान्य जनतेला जो त्रास सहन करावा लागतोय त्याला सीमा नाही. आधीच वाहनं खच्चून भरलेली असत. त्यात आणखी भर पडली आहे. बसचे मार्ग बदलले आहेत. त्यामुळे कित्येक बसस्टॉपवर माणसांना तासन्तास उभं राहावं लागतं. आलेल्या बसमध्ये केवळ पाय ठेवण्यापुरता शिरकाव मिळवण्यासाठी कोण यातायात करावी लागते ! धक्काबुक्की, लोटालोटी यात कपडे पार चुरगळून जातात. बसमध्ये गर्दी इतकी विलक्षण असते की, आणखी तीन-चार माणसं जबरदस्तीने मागच्या दारातून आत घुसली तर नक्कीच तीन-चार माणसं समोरच्या दारातून आपोआप बाहेर लोटली जातील असं वाटतं. याशिवाय बसच्या मागे-पुढे व बाजूला सराईत माणसं लटकत जातात ती वेगळीच !

हे सर्व आज सहन करावं लागतंय. उद्याच्या सुखी जीवनासाठी. एकदा ट्यूबरेल्वे तयार झाली की, लोकांची खूप सोय होणार आहे. कमी वेळात, कमी त्रासात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी त्यांना सहज जाता येईल. ट्यूब रेल्वे तयार झाली की समस्या सुटणार हे आजचं स्वप्न आहे; पण ते उद्या साकार होईल का ? रेल्वे तयार झाली तरी समस्या कायम राहण्याची शक्यता आहे. याचं कारण लोडशेडिंग. आज शहरात नि आजूबाजूच्या परिसरात आवश्यक तेवढा विजेचा पुरवठा उपलब्ध नाही. उद्या भूगर्भ-रेल्वेसाठी तो कोठून येणार हा सामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे. वीजपुरवठा होऊ न शकला तर इलेक्ट्रिक रेल्वे होऊनही काय उपयोग ? आजचा संभ्रम आणि उद्याची आशा ह्या दोन बिंदूंमध्ये कलकत्तावासी जनतेचे मन सध्या तरी हेलकावेच खात आहे. □

## लोडशेडिंग आणि मुख्यमंत्री

आमचे मुख्यमंत्री श्री. ज्योति बसू यांना एकदाची फुरसद मिळाली आणि त्यांनी इलेक्ट्रिसिटी बोर्डाची तपासणी करून रोज वीज जाण्याच्या प्रकाराची चौकशी 'खुद्द जातीने' केली. त्यांनी आम्हाला आज सांगितलं की, सगळी गडबड मॅनेजमेंटमध्येच आहे. लोक कामच करीत नाहीत म्हणून इतका गोंधळ माजलाय्. दिवसातून जेमतेम चार तास वीज असते नि बाकी वेळ विजेशिवाय राहण्याची पाळी येते, याचं कारण इलेक्ट्रिसिटी बोर्डातील अंदाधुंदीचा कारभार. बिच्चारे ज्योति बसू ! तसे अजून ते अनुभवाच्या दृष्टीने लहानच आहेत. कम्युनिस्ट राज्यांमध्ये ते सर्वांत लहान मंत्री आहेत. त्यांची कारकीर्द म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाच्या अनुभवाचं वय जेमतेम दोन वर्षांचं ! आता ही तपासणी अगोदरच करायला हवी होती, एकेकाला हासडायला हवं होतं हे नाही कळत कधी कधी माणसाला ! एखाद्याची ट्यूबलाइट उशीरा लागते, काय करणार !

तर सांगायचं म्हणजे आमचे बसूदादा तसे जरासे हेच आहेत. म्हणजे अगोदर ते तर्क लढवतात व नंतर खोलात शिरतात. आता ह्या लोडशेडिंगच्या बाबतीतच पहा. त्यांना प्रथम वाटलं, आपल्या इथली मशिनरी जुनाट-खराब झालेली आहे. म्हणून त्यांनी केंद्र सरकारच्या मागे लकडा लावला— आम्हाला रशियातून नवीन टर्बाइन्स आयात करण्याची परवानगी द्या. हा हट्ट खुंटीवर टांगला गेला तेव्हा ते म्हणू लागले की, इलेक्ट्रिसिटी बोर्डात काम करणारी माणसं कांग्रेसच्या काळातली आहेत व आमचं मार्क्सवादी राज्य सरळपणानं चालू नये असंच त्यांना वाटत असल्यामुळे ते जाणूनबुजून गडबड-घोटाळा करतात. आता या लोकांना कामावरून काढून टाकून त्याऐवजी मार्क्सवादी विचारांची माणसं लावून घेण्याचा त्यांचा मानस आहे की काय कोण जाणे ! बरं, नंतर त्यांना असा शोध लागला की, ही जी माणसं नेमलेली आहेत ती खरी जाणकार नाहीतच. नवी पॉवर युनिटस् कशी चालवायची याचं त्यांना ज्ञानच नाही. तसंच कुठे एखादी केबल जळून खाक झाली व त्या प्रदेशात लागोपाठ तीन दिवस वीजच नसली तरीदेखील त्या दृष्टीने काही प्रयत्न करायची त्यांची तयारी नाही. म्हणजे नवं काम समजत नाही, जुनं दुरुस्त करता येत नाही, अशी नालायक माणसं कामावर आहेत व म्हणून हा सर्व त्रास उद्भवला आहे. असो !

त्यानंतर ज्योतिबाबूंनी स्वतःच्या डोक्यातून एक शक्कल काढली. सर्व कारखाने सहा दिवस बंद ठेवण्याचा हुकूम दिला. आता यामुळे लाखो लोकांचं सहा दिवसांचं उत्पन्न बुडणार म्हणून आरडाओरडा होईल याची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी जाहीर केलं की, ह्या सहा दिवसांचा पूर्ण पगार वाटण्यात येईल. असा प्रयोग करून विजेचा पुरवठा समप्रमाणात प्रसारित करता येईल असा त्यांचा हिशोब होता. परिणाम काहीच झाला नाही. आम्ही अजूनही काळोखात जगतोच आहोत; पण मनात एक विचार येतो, सहा दिवस फुकट पगार वाटण्यास कारखानदार कसे तयार झाले ? याचा अर्थ सर्व वस्तूंचे भरमसाठ भाव वाढवून द्यायचे व नुकसानभरपाई करायची हा त्यांचा मानस असावा काय ? म्हणजेच कारखानदारांचे बोट धरून तर मार्क्सवादी सरकार वाटचाल करीत नसेल ना, अशी दाट शंका येते.

ते काही का असेना, आज आम्हाला पुरेशी वीज मिळत नाही एवढं खरं. हे असंच चालू राहिलं तर कदाचित् आमच्यावर कायमचे काळोखात राहण्याची पाळी येईल. नेम नाही. आम्ही मनाची तीही तयारी करीत आहोत. □

ललित लेख

# भिरी भिरी भ्रमंती

मस्ती भागवण्यासाठी गेलो होतो तो बरोबर एका विलक्षण मस्तीची शिदोरी घेऊन परतलो

अविनाश भगवंत धर्माधिकारी

'तू हाक देऊनही कोणी ओ दिली नाही...तर बेटा एकटा चाल... एकटाच चाल...' हे गुरुदेवांनी सांगितलंय; पण कधी कधी कोणालाही हाक न देताच चालण्याचा आवेग येतो. स्वत:च्याच धुंदीत...जणू सगळया जगाला तुच्छतेने, निदान अलिप्ततेने बाजूला सारत...स्वत:च्याच तालात. एकतानतेने जाण्याची भावना प्रबळ होते. त्याला मस्ती म्हणतात !

अशाच एका मस्तीच्या झटक्यात ठरलं की...

एकटंच...सायकलवरून...फारसे पैसे न घेता जायचं. पुण्यातून खंडाळा घाटातून पनवेल. तिथून मुंबई-गोवा महामार्गाने पेणवरून, महाडहून, वरंधा घाटातून, कात्रज घाटातून पुण्यात उतरायचे. साधारण ४००–४५० कि. मी. अंतर कापायचे...तिसऱ्या दिवशी दुपारी घरी हजर.

बस्स, एवढीच योजना. बाकी मिळेल तो मुक्काम, येईल तो वेग. पहाटे सायकलवर टांग टाकली. जरा धडधड वाटत होती. मागं फिरावं की काय ? बरोब्बर सव्वासहाला वाकडेवाडी-द्वारातून वाकून मुंबईच्या 'वाटेला लागलो.' मागून धडधडत आगगाडी गेली. पुण्याकडे जायचा रस्ता बंद. आता पुण्यात जायचं तर तिकडून कात्रज घाटातून दोन दिवसांनी.. बहुधा–बहुधा...

मी आणि सायकल, बाकी कोणी नाही. स्पर्धा घड्याळाबरोबर. खरं तर स्वत:बरोबरच आणि 'ज्याची स्पर्धा स्वत:शी आहे त्याला जिंकणारा कोण आहे ?'

रस्ताही झकास. डोंगरामधून, नदीकाठाने, रुळाशेजारून...असा वळवळत दूरवर गेलेला. तो जिथपर्यंत दिसतोय तिथपर्यंतच जायचं आहे असं म्हणायचं, म्हणजे 'थोडंच अंतर आहे, आत्ता जाऊ' असा चांगला परिणाम होतो. मनात मात्र पक्कं ठेवायचं की, खूप लांब अंतर काटायचंय आज मला झोपण्यापूर्वी...

चित्रं झरझर पळत गेली. कडेचे कारखाने...वडगाव, लोहगड, विसापूर, कार्ला. सव्वादहाला लोणावळयातून धूळ उडवत भुर्रकन ट्रक शेजारून गेला. चार तास चौसष्ट कि. मी. एक नोंद. तासभर भटकलो.

नंतर निघालो शिट्टीवर सूर फिरवत. खंडाळा घाटातून. व्वा ! काय पण घाट आहे ! ज्यांचा कधीही पाडाव होऊ शकला नाही अशी आडमुठी आणि उत्तुंग माणसं. जणू लाव्हा रसातून कोरून काढलीत. रौद्रपणातही सौंदर्य असतं. उगीच नाही तांडववेड्या शंकराला पार्वतीनं पसंत केलं ! कडे पण सणसणीत दोन–तीन हजार फुटांवरून सरळ सुटलेले ते गचकन् कोकणात कधी येऊन धडकले ते त्यांचं त्यांनाच कळलं नसेल ! सह्याद्रीच्या कड्याकडून छातीसाठी ढाल घ्यावी. ' दे रे, अशी ढाल दे ! तरुण आहे मी !'

खोपोलीतून थोडं पुढं सायकलने एक किंकाळी फोडली. कचकचत ब्रेक दाबला. दहा फूट मागं डावं पेंडल मोडून पडलं होतं...तसंच कसं तरी बसवलं, तर थोडं पुढं उजव्या पॅडललाही गुण नाही, पण वाण लागला. तेही मोडलं...

वाटेत मढच्या गणपतीच्या पाया पडलो. त्या भर दुपारी दर्शन घ्यायला आलेलं ध्यान पाहून सुस्तावलेला विघ्नहर्ता गडबडून सावरून बसला असेल. बाकी सारं शांत होतं. आपण 'सर्व संकटांवर रामबाण उपाय' असलेल्या अष्टविनायकांपैकी एक आहोत, याची जाणीव नसावी त्याला.

उजवं पॅडल परत परत धूळ खायला लागलं. घोटे भरून आले. 'डाव्यापेक्षा मी उजवा आहे' हे सिद्ध करायचं असावं त्याला. पनवेल १९ कि. मी. ऊन मस्त रणरणायला लागलं होतं डोक्यावर. खोपोली सोडलं की पनवेलपर्यंत वाटेवर गावच नाही. घसा तर पार खेड्यातल्या विहिरीसारखा कोरडा. सूर्याचं काय ? त्याचा उद्देश कदाचित आपल्या किरणांमधून मला अधिक शक्ती देण्याचा असेल; पण दुसऱ्याकडून चांगली का होईना, शक्ती उधार घेणे त्रासदायकच. म्हणून उखडलो.

तुटकं पॅडल हातात घेतलं आणि चक्क पळत सुटलो. कसा नाही पोहोचत पनवेलला पहातोच. च्यायला, रस्त्यावरचं डांबर विरघळू लागलं होतं. कॅनव्हासच्या बुटांतून चटके बसायला लागले. दूरवर बहुधा कर्नाळयाचा वैशिष्टयपूर्ण सुळका दिसत होता. उद्दिष्ट लांबचं असलं तरी असं स्पष्ट दिसणं बरं असतं. नाही तर शॉर्टकटच्या नादात मूळ वाटच हरवून जायची.

थोडं पळत, थोडं चालत, फासफूस करीत, मागून येणाऱ्या ट्रक–मोटारींना हात दाखवत. पण सगळयांनी बाबा भारती आणि घोड्याची गोष्ट वाचली असावी. कोणी घेईचना गाडीत. पनवेल ९ कि. मी. वर असताना एका ॲम्बॅसिडरवाल्याला माझी दया आली. त्याने मला गाडीत घेतले. बदल्यात त्याच्याशी आणीबाणी, जनता पार्टी वगैरे गप्पा मारायला माझं काय जातंय !

पनवेलला पोहोचलो तेव्हा घामाच्या धारा लागल्या होत्या. कान तापले होते. पाळयांमागून घामाच्या धारा पाठीवर गेलेल्या... कोकणात सगळया धाराच. घामाच्या, नाही तर पावसाच्या. कधी कधी कर्तृत्वाच्यासुद्धा. सायकल दुरुस्त करून घेतली. पैसे उडाले. पुन्हा टांग टाकली. दहा कि. मी. वर कर्नाळा किल्ला आणि त्याच्या

पोटातील पक्ष्यांचे अभयारण्य. पण स्नायू एकदा थांबले की, त्यांना परत कामाला लावणं अवघड. जाम आखडू. ते दहा कि. मी. म्हणजे भरल्या गाडीला चिपाडाचं ओझं. वाटेत शिरढोण खेडं आहे.

हे वासुदेव बळवंतांचं गाव. आकाश फाडत वर उसळलेल्या कर्नाळघाच्या सुळक्यानं या खेड्यातल्या बोकडाची गाडी चालविणाऱ्या मनात कसल्या कसल्या ऊर्मी निर्माण केल्या होत्या ! एडनला तुरुंगाची भिंत फोडतानाही त्याला शक्तीची उणीव भासली नाही. ते त्याचं जन्मगाव. शंभर वर्षांपूर्वी जसं बकाल, सुस्त असेल तसंच आताही आहे. आता तिथं वासुदेव बळवंतही नाहीत. त्यांचं नाव लावणारं एक चंद्रमौळी सभागृह आहे. त्याच्या जागेत शेळ्या-मेंढ्या चरत होत्या आणि भावी भारताचे सुजाण नागरिक शेंबूड पुसत गोट्या खेळत होते.

संध्याकाळी कर्नाळघाच्या कुशीत पोचलो. 'मोहक सांजवेळ' ही शब्दरचना प्रत्ययकारी आहे, हे त्या संध्याकाळी लक्षात आलं. दिवसभर काही खाल्लेलंच नव्हतं. चापून जेवलो आणि रस्त्यालगत एका झाडाखाली थंड वाऱ्यात पडलो. चांदण्या मोजता मोजता झोप कधी लागली तेही कळलं नाही.

पहाटेच उठलो आणि निघालो. महामार्ग तो. ट्रक्सची वाहतूक चालूच होती. बुंऽऽग करत चाटून जायची ती धुडं. हातातली विजेरी दोन फुटांवरचा अंधार दाखवत होती. क्षणभर मागं फिरावंसं वाटलं; पण हे असलं भौतिक मागं फिरणंसुद्धा मनात पराभवाची भावना निर्माण करतं म्हणून तसाच पुढं निघालो. उजाडता उजाडता पेण गाठलं. चहा प्यालो.

आणि मग अंगात हीव भरल्यासारखा सुटलो. पँट गुंडाळून मोज्यात कोंबली. खोचलेला गंजिफ्रॉक, डोळ्यांवर गॉगल आणि केसांना रुमालाची पट्टी बांधली. भन्नाट वेग घेण्यासाठी एवढी तयारी पुरी असते. लोवर हँडलवर टेकवले. कंबरेत वाकलो आणि वाऱ्याबरोबर सुटलो.

उजाडत होतं. खेडी जागी होत होती. विहिरीवर पाणी भरायला येणाऱ्या स्त्रिया, गळ्यातली घुंगरं वाजवत रांगेनं चरायला निघालेली गुरं, शेतावर चाललेले शेतकरी. अगदी सिनेमातल्यासारखं. आता कुठून तरी कोणी वहीदा येईल आणि 'सपने सुहाने लड़कपनके...' म्हणायला लागेल असं वाटणारं (असले फालतू विचार नंतरचे. तेव्हा फक्त गाते...गाते...)

न थांबता निश्चित गतीनं अंतराचे घास गिळत गेलो नागोठाणं ...कोलाड...इंदापूर...माणगाव... सूर्य त्याचं वर येण्याचं काम निष्कामपणे करीत होता. ब्रह्मदेवानं योग पहिल्यांदा सूर्याला शिकविला. वा ! आता मोटारींची वर्दळ सुरू झाली. अॅम्बॅसिडर, पद्मिनी, स्टँडर्ड गजल...क्वचित मर्सिडीझ्...इंपाला...उन्हाळ्याचे दिवस नाही का ! गोव्याच्या किनाऱ्यावर प्रदर्शनं भरली असतील.

गाड्या अशा भुर्रकन् शेजारून जायच्या...रंगीबेरंगी कपड्यातली माणसं या विचित्र ध्यानाकडे बघत रहायची...त्यातली लहान पोरं (टॉमी, जिमी वगैरे) टाळ्या पिटीत सांगत असतील. 'मम्मी, लुक ...फनी थिंग' मम्मी गॉगल सावरत एकदा काचेतनं मागं बघेल... 'ओह् श्शॅबी !' करून आपली नजर परत फिल्मफेअर नाही तर फॅमिनात वळवेल...

११॥ ला माणगावाला स्पर्श केला. बाजार होता वाटतं. उतरून दोन बनपाव घेतले आणि खातखात पुढं महाड ३० कि. मी. ९५ किमीचं जेवण केल्यानंतर तीस किमीची स्वीट डिश जड वाटत होती; पण जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. थोडं पुढं गेल्यावर दोन डोंगरांमधून रायगड दिसला. एकदम मोहरलोच. दोन मिनिटं तिथेच थांबलो.

दुपारचा ठीक पहिला प्रहर उलटून दहा मिनिटे झाल्यावर 'महाड नगरपालिकेनं आमचं सहर्ष स्वागत' केलं. काल नदीत मस्तपैकी पोहलो. सगळे श्रम झरझर पाण्यात विरघळत गेले. त्यानंतर जेवण झाल्यावर खिशात पाच नाणी पैशाची उरली. अजून आख्खा एक दिवस जायचाय !

तिथून रायगडकडे. नुसता खुबलडा बुरुजाला भोज्या करून मागं फिरलो. कारण वाटेतला वरंधा घाट अजून छातीचा एक ठोका चुकवत होता. आज शक्य तेवढं पुढं जावं म्हटलं. वरंधा घाट म्हटल्यावर शिवथरघळीची आठवण झाली. समर्थांनी दासबोध जिथं बसून लिहिला ती जागा. वरंधा घाटात मधे माझेरी गाव आहे. तिथून पायवाटेने खाली उतरले की शिवथरघळ. जावं तिथंच असं डोक्यानं घेतलं.

महाड ते वरंधा बरोबर वरंध्यातला एक विद्यार्थी होता. वरंध्यात पोचलो तेव्हा सात वाजले होते. अंधार पडतच होता. तो विद्यार्थी म्हटला 'आज मुक्काम कर आमच्याकडेच!' खेड्यात हे बरं असतं. तीन रु. जनरल बेड आठ आणे गरम पाणी...सकाळी उठविण्यासाठी सांगून ठेवणं आणि वर रात्रभर आशा भोसलेच्या किंकाळ्या ऐकण्याची शिक्षा असलेल्या अमानुष संस्था नसतात; पण मी त्याला म्हटलं, 'आजचा मुक्काम शिवथरघळीत.' तो हसलाच. म्हटला, 'मरायचं बिरायचं आहे का रात्री वरंधा घाट चढताय ते !'

मी वर पाहिलं. वरंधा घाट असा पसरला होता. रस्ता कसला एका सरळसोट कड्यामध्ये एकावर एक वळणे रचली होती नुसती. छातीवर येणारा चढ होता. संध्याप्रकाशात डोंगर शांत अडिग बसले होते. '.........' माझ्या अंगावर येणारी सूर्याची किरणं तू अडवतो आहेस. बाजूला हो ! असं सांगणारा प्रशांत ऋषी त्या सिकंदराला कसा दिसला असेल ? तर असा, या पहाडासारखा ! नकोच, रात्रीचं जायचं धाडस नकोच करायला !

तो पोरगा अपेक्षेनं पहात होता. 'पोरगा रहातंय इथंच' असं. मग एकदम खवळलोच. हट्–जायचंच. पाहू तरी काय होतंय...

हा वरंधा घाट काय खिजवतो का काय मला ? निघालो. सायकल पहिला कि. मी. चढली. मग पॅडल आणि चाकं फिरेचनात. उतरलो आणि झपझप पावलं टाकायला सुरुवात केली. एक कि. मी., दोन कि. मी., ४०० मीटर, ८०० मीटर.

अंधार दाटत गेला. जादूगारानं नितळ स्वच्छ पाण्यावर फुंकर मारून पाणी हलवावं आणि हळूहळू पाणी काळसर ..काळं होत जावं तसा अंधार दाटत गेला. डोंगरांच्या रेषा पुसट होत गेल्या. महाडमधला एखादा दिवा लुकलुकायला लागला. पुढचा रस्ता... मग १००' फुटांवरचं, ५० फुटांवरचं असं कमी कमी दिसायला लागलं.


घाट एकदम निर्जन...आजूबाजूला किर्र झाडी...रातकिड्यांनी रात्रपाळी सुरू केली. मागं पुढं अंधार...फक्त अंधार.. नाही म्हटलं तरी भीती वाटायला लागली. साकळून येत गेली. दोन–तीनदा तर माझ्याच बुटांच्या आवाजाला दचकून मी मागं पाहिलं. तरीही मान खाली घालून चालतच राहिलो. दोनएक मिनिटांनी एकदम फिस्कन हसलो. माझ्याच पायांकडे पाहिलं. दोनच दिवसांपूर्वी घेतलेले पांढरे शुभ्र बूट चकाकत होते आता या अंधारात लांबून भुतांनी जरी मला पाहिलं तरी ते घाबरायला हवं. 'अरेच्या, हे भूत कुठून आलं,'



“कठीण आणि खरखरीत
टूथ पावडरी तुमच्या
हिरड्या नि दातांना
इजा करू शकतात...”

# कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — नि श्वास दुर्गंधीही थांबवा!






कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हलुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MR

म्हणून. मला कसली भीती? अशी माशीसारखी उडवून लावली तिला आणि मग त्या अंधाराचा...शांततेचा आनंदच वाटायला लागला.

८॥ला माझेरीतले कंदील दिसले. तिथल्या शाळानामक सार्वजनिक जागेच्या व्हरांड्यात टिमटिमत्या दिव्यात काही वडारी पत्ते खेळत बसले होते, तिथेच गेलो. ते घाटात काम करणारे वडारी होते. त्यांना विचारलं, ‘जेवण झालं का?’ ‘नाही’ म्हणून माझा डबा बाहेर काढून त्यांच्यासाठी थांबलो. मी एक-एक वस्तू काढत असताना एक पोरगं माझ्याकडेच बघत होतं. पोळ्यांची पिशवी, साखरांब्याची बाटली, लोणच्याची डबी...

एकदम डोळ्यासमोर तीन चित्रं उभी राहिली. वडारी, मी आणि सकाळी ज्यांना हसत होतो ते मोटारवाले. मी जसा त्या मोटार-वाल्यांना हसत होतो तसं ते पोरगं मला हसत असेल. त्याचं रोजचं जेवण पटकुरात बांधलेली चटणी-भाकर. आमच्या समाजाचे तीन स्तर...मी मध्यमवर्गीय. मध्यमवर्गीय! काय शब्द आहे!

लगेच झोप लागली नाही. जरा वेळ लागला. मग मात्र शांत झोपलो. आजचा हिशेब २०५ कि. मी. १४ तासांचं सायकलिंग. शिल्लक डब्यात एक पोळी, खिशात पाच पैशांची पाच नाणी.

शेवटचा अध्याय...आज सव्वातीनला घरी असणार की नाही? शंका कसली, असणारच! आज पहिलीच गाठ वरंधा घाट. जाम फसवा आहे पठ्ठ्या! संपतो वाटतं; पण संपतच नाही. चालतच... एकावर एक वळणं. एका ट्रकवाल्यानं खिजवलं, ‘धर मागं!’ चिडून सायकलवर बसलो. ताणली आणि ट्रकची साखळी पकडली. मग प्रत्येक वळणावर क्लीनर मागं वळून पहायचा, ‘आहे की पोरगं अजून.’ दोन–तीन वळणं चढल्यावर एकदम भुईतून उगवल्यासारखे तोरणा–राजगड दिसायला लागले. तोरणा–राजगड म्हणजे पुणे आलंच की! पुणं ९५ कि. मी.

घाट संपला. ‘राक्षसी’ याशिवाय दुसरं कुठलंही विशेषण त्याला नाही. उतारावरून सायकल बेफाट सोडली आणि सगळ्या गोष्टी भरभर घडल्या. सायकल पंक्चर, ते काढण्याच्या प्रयत्नात दोन नवीन भोकांची भर. मग तसंच सायकल घेऊन पळत सुटणं, टेंपोतून भोर, तेथे फुकटात पंक्चर काढून घेणे आणि बिगबिगत पुण्याकडे वगैरे...

भराभर गावं मागं टाकत कामथडी, खेड, शिवापूर, शिंदेवाडी... कात्रज घाटाच्या बोगद्यातून बाहेर आलो. समोर पुण्याने एअर-इंडियाच्या महाराजाच्या थाटात स्वागत केलं. (निदान मला तसं वाटलं.) जीभ वळवली आणि एक कर्कश शिट्टी मारली. ओरडत-आरडत आनंदानं किंचाळत घाट उतरू लागलो. माझा आनंद मला लखलाभ!

कातडी रापली. (म्हणजे काळा झालो; पण त्याची कदर कुणाला) मनगटाला भक्कमपणा आला, पिंढऱ्यांना बाकदारपणा आला. दारात उतरलो तेव्हा तीन वाजून दहा मिनिटं झाली होती. दोन बोटं घातली आणि झकास शिट्टी मारली. वर्दी दिली, ‘मी आलोय!’ (निदान एक चहा द्या.)

एक छोटी गोष्ट केली तर किती आनंद!

मस्ती भागवण्यासाठी गेलो होतो तो बरोबर एका विलक्षण मस्तीची शिदोरी घेऊन परतलो. माझी ही संपत्ती कोण हिरावून नेऊ शकेल? या संपत्तीचा शोध लावण्यातच मी सध्या गुंतलो आहे.

कथा

# कार्ल मार्क्सचा डोळा

मनोहर सोनावणे

'मे आय कम इन सर ?'

त्या चारही भारदस्त नजरा माझ्याकडे वळल्या. छोटचाशा केबिनच्या दारात मी नम्रतेची शाल पांघरून उभा होतो; पण तरीही त्यांच्या नजरेतील गांभीर्य हाडांना सणकावून गेले. कण्यातल्या मणक्या-मणक्यातून जणू काही आत ढकलल्याची संवेदना सरकत सरकत गेली.

'येस, कम इन !'

त्या चौघातली साधारणत: मध्यावर बसलेली, जवळजवळ सारेच केस पांढरे असलेली, तरीसुद्धा मधूनच एखादी काळी छटा चमकून जाणारी व्यक्ती बोलली. गोलाकार चष्म्यातून थंड नजर शरीराला गुदमरवून टाकीत होती.

'प्लीज सीट डाऊन.'

जणू याच शब्दांची शरीर वाट पहात असावं आणि सारं अवसान कोसळून मी खुर्चीत धप्पकन पडलो. तरीही शरीराचं एक मूळ कशाला तरी घट्ट लपेटून बसलं होते. चेहऱ्यावर शक्यतो भीतीची प्रतिक्रिया किंवा दडपणाची भावना न जाणवू देता मी तसाच बसून राहिलो. त्या बिथरलेल्या परिस्थितीतही मेंदूला हातातल्या फाइलची जाणीव झाली.

यंत्रवत हालचाली घडल्या. मी फाइल टेबलावर ठेवली. मग नुसताच केबिनची पहाणी करू लागलो. सर्वसाधारण ऑफिसची केबिन जशी असते तशीच ती होती. चार पाच मोठी कपाटे–गोदरेजची. पॉलिश्ड भिंती, छताला टांगलेला–गरगर फिरणारा पंखा–एक–दोन कॅलेंडर्स–चार जणांसमोर चार टेबले. एका जाळीदार प्लास्टिकच्या ट्रेमध्ये ठेवलेली व्यवस्थित रचलेली कागदपत्रे.

'तुमचंच नाव सुहास मोरेश्वर देशमुख?'

प्रश्न समजायला दोन सेकंद जाऊ द्यावे लागले. मी शर्टच्या खिशातील रुमालाने चेहऱ्यावर साठलेले घर्मबिंदू टिपीत मान हलवली.

'हं......'

मग फाइलमधील कागदपत्रांची उलटापालट–दोन-चार सर्टिफिकिटं, काही प्रशस्तिपत्रकं आदी कागदपत्रं असलेली फाइल.

तसा माझा हा किमान विसावा इंटरव्ह्यू. पण एक्सप्रेशन्स दवडताच येत नाहीत. छातीवर भले मोठे दडपण आल्यासारखे वाटते. शरीरातून रक्ताचे प्रवाह उलटसुलट फिरल्यासारखे वाटतात. हृदयाचे घाव कानावर धडधडू लागतात. पायांचे स्नायू काम देईनासे होतात. एक प्रकारची मरगळ अवस्था निर्माण होते...

'मिस्टर सुहास, आपण आर्टस्‌कडले नाही का ?'

'हो.'

'इकॉनॉमिक्स – ग्रॅज्युएशनचा स्पेशल सब्जेक्ट, होय ना ?'

'हो.'

'एक साधा प्रश्न. तुम्हाला अधिक आवडणारा इकॉनॉमिस्ट कोणता ?'

आजपर्यंतच्या इंटरव्ह्यूत कधी असा विक्षिप्त प्रश्न आला नव्हता. सरावाने माहीत होते– अमका तमका कोण होता ? किंवा जगातले सर्वांत मोठे हे कोणते ? किंवा आणिक इतर प्रश्न; पण हा तर भलताच प्रश्न ! कोण आवडतो ? अॅडम् स्मिथ की मार्शल की माल्थस ? छे:, यापैकी कोणीच नाही ! की अगदी लॉर्ड केयन्स की कार्ल मार्क्स ?

'कार्ल मार्क्स !' मी अनपेक्षितपणे उत्तर दिले.

'का ?'

मी दचकलो. तीन फूट उडालो. जितक्या अभाविनपणे मी आधी उत्तर दिले तितक्या अभावितपणे मी उत्तर देऊ शकत नव्हतो' शकणार नव्हतो. 'कार्ल मार्क्स का आवडतो ?' 'का ?' मी एक साधासुधा माणूस. आर्टस्‌चा विद्यार्थी. कारकुनीच्या अपेक्षेने येथे आलेलो. काय संबंध माझा मार्क्सशी ? भले त्याच्या तत्त्वांवर नवी राज्यघटना आली. भली जगात उलथापालथ झाली; पण तरीही मार्क्स मला आवडत होता. ते नाव मला जास्त परिचयाचे वाटत होते. जवळचे भासत होते. त्याचे तत्त्वज्ञान माझ्या शरीरावर पकड घेऊन बसल्यासारखे वाटत होते. तरीही त्यातले मला काहीच समजत नव्हते. मी 'मार्क्स' वाचला होता का ? त्याच्या 'कॅपिटल'मध्ये काय होते हे मला माहीत होते का ? नव्हते. तरीही इतरांना डावलून मी मार्क्सचे नाव घातले होते.

वेळ लांबत होता. रबरासारखा लवचिक होऊन ताणला जात होता. असह्य शांततेत त्या चार जणांच्या आठ नजरा माझे अंतरंग ढवळून काढीत होत्या. मी गुदमरत होतो का ? नक्की सांगता येत नाही. मी उगाचच मार्क्सचे चित्र मनात घोळवत होतो. कसा असेल मार्क्स ? मार्क्सचे चित्र असेल कसे– एखाद्या रोमन सोल्जरसारखे की इंडियन महाराजासारखे ? तसे शक्य नसेल तर ? की फुटपाथवरच्या भिकाऱ्यासारखे ? चित्र रंगत होते. मनाला येईल तसा आकार मिळत होता.

तरीही मनापुढे साकारणारे चित्र एका माणसाचे होते. चार हात असलेल्या परमेश्वराचे नव्हते. आवडणाऱ्या माणसाला भगवान समजणारा मी नव्हतो. माझ्या नजरा चित्राचा मागोवा घेत होत्या.

लांब वाढलेले मानेवर रुळणारे केस. सरळ उंच नाक, पसरट रुंद कपाळ, पांढऱ्या भुवया आणि अर्थपूर्ण नजर–अर्थपूर्ण डोळे– त्या डोळ्यांतल्या विविध गहिऱ्या छटा... पसरत पसरत गेलेली छटांची वर्तुळे आणि काहीसे स्मित असलेले ओठ !

असेल ! असा मार्क्स कदाचित दिसतही असेल. तरीही मनाचा कुंचला त्या चित्राच्या नजरेभोवती फिरत होता. किती विरोधाभास ! त्या आठ नजरा मनात ठाण मांडून बसल्या असताना माझी नजर मात्र तिसऱ्याच नजरेकडे !

आणि अचानकपणे–पुन्हा एकदा अभा-

वितपणे माझ्या ओठांतून उत्तर सुटले. जणू आधी मी ते तोंडात घट्ट साठवले होते. तोंडातल्या तोंडात घोळले होते आणि हळूच तोंड उघडून सोडून दिले होते—वाऱ्यावर आरूढ होऊन ते शब्द ध्वनिलहरींच्या माध्यमातून थेट आठ कानांकडे पळाले. उत्तर होते—

'मला त्याचे डोळे आवडले म्हणून !'

विक्षिप्त प्रश्न—विक्षिप्त उत्तर. अगदी मलाही न समजणारे उत्तर.

त्या चारही जणांच्या आठ डोळ्यांची अर्थपूर्ण नजरानजर झाली; पण माझ्या डोळ्यांसमोर विसावला होता कार्ल मार्क्सचा डोळा !

त्यानंतर जुजबी प्रश्नोत्तरे होत गेली.

पण प्रत्येक उत्तरानंतर कार्ल मार्क्सचा डोळा एकेक आवर्तन घेत होता !

त्याच्या डोळ्यांतल्या नव्या नव्या छटा मनःपटलावर साकारत होत्या. जणू मनाच्या रंगपटावर कुणी तरी बहुरूपी एकच चेहरा विविध दिशांतून दाखवत होता किंवा कोणी तरी जादूगार आपल्या अंगरख्यावरच्या विविध खिशांतून एकाच कागदावरची वेगवेगळी चित्रे फेकत होता.

'नाऊ यू मे गो.'

'थँक्यू—थँक्यू व्हेरी मच' असे काहीसे पुटपुटत मी केबिनबाहेर आलो.

क्षणभर चक्रावून मी बाहेरच्या मोठ्या घड्याळाकडे पाहिले. जणू माझी वाट पाहत लंबक किती तरी वेळ तिष्ठत उभा होता. माझ्यानंतरचा एक उमेदवार केबिनच्या दारात उभा राहून 'मे आय कम इन सर ?' विचारत होता.

¤

माझ्यासमोर एका भल्या मोठ्या पोर्ट्रेटचा एक तुकडा दिसत होता. तुकड्यावर व्यापला होता एक भला प्रचंड डोळा. पांढरट भाग, बुबुळ आणि त्यात छोटीशी बाहुली. मी पुढे पुढे चालत गेलो—चालत होतो—चालता चालता एकदम थांबलो. त्या डोळ्यावरून मी हात फिरवला. क्षणभर पापण्यांची मिटामिट झाली.

आधी भुवई—मग पापणी—मग डोळ्याचा पांढरट भाग—त्या अलीकडे निमुळता होत गेलेल्या पांढऱ्या भागात दिसणारा आरक्त वर्ण—माझा हात सावकाश पोचत होता; पण तो डोळा तसाच होता. मग बुबुळ आणि मग बाहुली. मी हाताने बाहुली चाचपली. तो कदाचित दारासारखा भाग असावा. निदान मला तरी तसे वाटले—मी हाताने थोडेसे ढकलले. बाहुली किरकिरल्यासारखी झाली आणि मग चक्क दुभंगली...

मी पटकन त्या पोकळीतून आत शिरलो. वाटले चला कार्ल मार्क्सचा डोळा तर सापडला. न जाणे कित्येक दिवस मी त्याला शोधत होतो आणि आता तर चक्क आत प्रवेश मिळतोय. मी आनंदाने वेडापिसा झालो. त्या अंधाऱ्या पोकळीतून मी चालू लागलो. हा मानवी डोळा नव्हता. खरे तर पोर्ट्रेटच्या आतला डोळा कसा असावा याची मी कधीच कल्पना केलेली दिसत नव्हती.

आणि मग मला अंधुक अंधुक दिसू लागले. ती बारा बाय दहाची खोली होती. डोळ्याच्या आतला भाग एखाद्या खोलीसारखा असूही शकेल ! खोलीत अंधार दाटला होता. तरीही अंधुक अंधुक दिसतच होते—एक छोटंसं काचेचं कपाट, अगदी आमच्या घरातल्या माझ्या कपाटासारखं ! (आमची खोलीही बारा बाय दहाची होती.) कपाटात अनेक जुनाट पुस्तकं, काही वह्या, दोन-चार कपडे एवढंच दिसत होतं. पलीकडे एक लहान कॉट, त्याच्याही थोडंसं पुढं एक कोनाडा—त्यात दिसणारं देवघर आणि देव ! थोडंसं पुढं एक लहान ओटा असलेली मोरी आणि त्याच्या शेजारी एक फरफरणारा स्टोव्ह—नाकात नथ घातल्यासारखा आकडा कोंबलेला—एक मांडणी आणि त्यावर मांडलेला खराखुरा संसार—चार-पाच जर्मनची भांडी, दोन-चार पितळेची आणि एक स्टीलचा डबा. खोलीच्या बारा फूट उंच भिंतीवर चारी बाजूंनी ठोकलेल्या फळ्या आणि त्यांवर मांडलेले पत्र्याचे आणि जर्मनचे डबे !

¤

पोर्ट्रेटमधल्या डोळ्याने एक आवर्तन घेतले असावे. मीही घेतले. आता मी खोलीत होतो. त्या कॉटवर एक माणूस— कदाचित माझे वडील छातीवर हात ठेवून खोकत होते. खोकला काही केल्या थांबत नव्हता आणि अगदी श्वास रोखून मी पहातोय. ते खोकताहेत— खोकताहेत— डोळ्यात पाणी साचलेय—नाकात शेंबूड फुरफुरतोय— तोंडातून पडक्या दाताखालून ओघळलेल्या ओठांच्या सहाय्याने लाळ गळतेय आणि बरगड्या न् बरगड्या मोजून काढाव्यात अशा फाटक्या उघड्या छातीवर एक आठ नऊ वर्षांची पोरगी आपल्या इवल्याशा हातांनी चोळतेय; तर तिच्याहून थोडीशी मोठी पोरगी पाठ जोरजोरात चोळतेय आणि एक सर्वांत छोटा, बुटका, केस पूर्णपणे भादरलेला पोरगा बापाकडे आशाळभूत नजरेने पहातोय. ती कदाचित माझी भावंडे असावीत.

'अग आई ग !' थकून तो माणूस जरासा खोकल्याचा थांबतो. तरीही घशातून श्वासाची घरघर येतच आहे.

'थांबा बाबा, दादा आता येईल. त्याला नोकरी लागेल आणि तो औषध आणील.'

तेवढ्यात माझे लक्ष मोरीच्या कट्ट्याकडे वळते आणि मी जोरात किंचाळतो— त्या वातावरणात किंकाळी हवेवर आरूढच होत नाही— होती तर आकाशाचे अभ्रे निखळून भुईवर कोसळले असते आणि वर जे कोणी पडदा लावून बसलेत त्यांना उघडी, बोडकी, रोगिष्ट, नासकी पृथ्वी आढळली असती.

त्या कोपऱ्यात एक तरुण शरीराची गोधडी करून बसलेला आहे. त्याच्या चेहऱ्यावर भावना नाहीत— रेषेचा एकसुद्धा ओरखडा नाही. त्याचे डोळे गारगोटीसारखे आहेत आणि शरीर सापासारखे वळवळते आहे. एक निष्क्रिय— उदास— महाभयानक मानवाचे ते रूप होते. गारठून गोठलेला एक सजीव माणूस ! तो मी होतो ! मलाच मी पहात होतो— कार्ल मार्क्सच्या डोळ्यातून ! त्याच्या शरीरातील रक्त गोठले होते की शोषले होते समजत नव्हते. त्याच्या मेंदूवरून कुणी वस्तरा फिरवला होता की काय कोण जाणे ! पण तो थंडावला होता— जणू पूर्णतः मेलेला होता आणि त्याचा प्रेतवत मुडदा वळवळत होता ! शेवाळ्यासारखी लिबलिबीत जाणीव मनाला भिडून सरसरत मेंदूत शिरली आणि त्या भयाण हिरवट स्पर्शाने मन किती वेळ थरथरत राहिले कोण जाणे !

¤

डोळ्याने आणखी एक आवर्तन घेतले. आता दिसत होता त्या बारा बाय दहाच्या खोलीतला एक कोनाडा— देव आणि देवघर असलेला. त्या कोनाड्यापुढे उभी होती एक

मध्यवयीन स्त्री. नऊवारी पातळातली. डोक्यावरचा फाटका पदर लपवणारी. पांढऱ्या बटा फिरवणारी.

'आई जगदंबे, डोळे उघडून बघ ना त्याच्याकडे, तुझ्याच नवसाचा ना ग तो आणि इतक्यातच त्याला विसरलीस? बाई ग, त्याचे कल्याण होऊ दे तुला खणा-नारळाची ओटी भरीन! त्याला नोकरी लागू दे ग आई!'

थंड पावले वाजली. माझा मेलेला मुडदा चालत येत होता. क्षणात त्याने हात गरकन फिरवला— देवघर उलथले होते. देव दूरवर फेकले गेले.

त्या स्त्रीने झटकन पदराखालचा हात काढला. फाडफाड तो त्या रक्त नसलेल्या हाडकट चेहऱ्यावर फडाफड वाजू लागला.

'मेल्या मुडद्या, चार पैसे कमवायची अक्कल नाही आणि खुशाल देव उडवतोस, अरे जनाची नाही तरी मनाची लाज असू दे.'

त्या निर्विकार चेहऱ्याच्या ओठांची फट रुंदावली आणि सळसळती जीभ उच्चार करू लागली.

'हं, म्हणे मनाची लाज! सालं मन आहेच कुणाला. ते तर कधीच कुजलंय. कचराकुंडीत जाऊन शोध त्याला. म्हणे जात ब्राह्मण. कसली ब्राह्मण एकच जात विकटलीय या तरुण शरीराच्या कुजकट वृद्ध मनाला. 'बेकार' हीच ती जात!'

□

आवर्तनं वाढू लागली. माझी खोली मागं पडली आणि अनेक खोल्या दिसू लागल्या. खोल्यांची कौलारू घरं झाली— घरांच्या झोपड्या— झोपड्यांच्या कुडाच्या भिंती आणि मग निव्वळ फुटपाथ—

तसाच चालत चालत मी गेलो. कोठून कसा बाहेर आलो समजले नाही; पण आलो. कार्ल मार्क्सच्या डोळ्यांतून प्रदक्षिणा घालून आलो.

अरे, पण हे काही तरी विचित्रच दिसतंय.

'या, या अॅडम स्मिथच्या केसांना बघा. हा पहा वेल्थ ऑफ नेशन्स'चा ग्रंथकार— या ग्रंथाच्या पहिल्या पानातून प्रवेश करा आणि पहा—'

'इकडे या, हा पहा. केयन्सचा जबडा. या असे इथून आत या.'

'हा पहा मार्शलचा डिमांड कर्व्ह. पूर्णतः स्वयंभू. या कर्व्हमधून असे चढा— पहा किती उंच गेलात. अबब ५००० फूट. खालचे काही दिसते का?'

'हा पहा एंजल्सचा बूट. या या बुटात पहा.'

'हे तर इकॉनॉमिक फनफेअर दिसतंय.'

मग अॅडम स्मिथच्या पानात मी हळूच शिरलो, तर केयन्सच्या जबड्यात शिरून तेजीमंदीच्या भयानक चक्रातून घिरट्या घातल्या. मार्शलच्या डिमांड कर्व्हमधून सूर मारला थेट एंजल्सच्या बुटात!

बुटातून पोहून बाहेर आलो. शरीर निथळत होते आणि बुटाबाहेर एक माणूस उभा होता— बिनचेहऱ्याचा— अगदी साफ बिनचेहऱ्याचा. त्याला श्वास घ्यायला दोन बिळे आणि बोलायला चिरके तोंड एवढेच होते.

'तू कोण?'

'मी एंजल्स!' चिरक्या आवाजात तो पुटपुटला.

'आं...' मी गोंधळलो.

'साहेब...'

'काय?'

'आपला बूट देता जरा डाव्या पायाचा? कारण माझा बूट हा इथे असा अडकलाय.'

मी डाव्या बुटाकडे पाहिले. त्याचा तळवा पूर्ण फाटला होता. 'मिस्टर एंजल्स, मी माझा बूट देऊ शकत नाही. कारण तो तळाकडून पूर्ण फाटलाय हो.'

त्याच्या खिन्न हास्याकडे पहात मी जीव घेऊन पळत सुटलो.

मनात विचार येत होते अॅडम स्मिथला दाढी असेल का?

लॉर्ड केयन्स अजूनही तेजी—मंदीचीच चक्रं फिरवीत बसला असेल का? आणि मी अडखळलो— पुन्हा एकदा मी त्याच पोर्ट्रेटाशी आलो होतो.

तो होता डोळा कार्ल मार्क्सचा! पण आता त्याने डोळ्यावर काळा चष्मा लावला होता! आणि मी ओरडत होतो—

'या या, हा पहा कार्ल मार्क्सचा डोळा! अभूतपूर्व डोळा! फक्त काळ्या चष्म्याआडून पहायचा— आत डोकवायचे नाही. सुंदर दिसतोय नाही डोळा! म्हणूनच मला कार्ल मार्क्स का आवडतो? केवळ त्याला डोळा आहे म्हणून! (आणि त्या डोळ्यातून होणाऱ्या आवर्तनातून दिसणाऱ्या विविध छटा आहेत म्हणून.) पण मी हे कसे सांगणार? कारण मार्क्सच्या डोळ्यावर आता चष्मा आलाय ना, आवर्तनं कधीच न दिसण्यासाठी! □





लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

पुस्तके

# अस्पर्शपणे फुलत जाणारी ' स्पर्शकमळे '

मराठी गद्य वाङ्‌मयात स्त्रीचं सौंदर्य आस्वादाच्या पातळीवर क्वचितच व्यक्त केलेलं दिसतं. बहुतेक वेळा स्त्री ही एक उपभोग्य वस्तूच मानली गेल्याने भोग-लालसेच्या विकारी अस्तित्वापलीकडे शृंगारिक वाङ्‌मयातील स्त्रीचं एक नितांत सुंदर अस्तित्व फारसं लक्षात घेतलं जात नाही, या जाणिवेतूनच स्त्रीचं हे उपेक्षित सौंदर्य विविध दृष्टिकोनांतून डॉ. आनंद यादव यांनी प्रथमच आपल्या 'स्पर्शकमळे' या पुस्तकात वासनामुक्त मनाने न्याहाळलं आहे, आपल्या वाचकालाही ते दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

एकाहून एक सरस असे पंधरा लेख या पुस्तकात डॉ. यादवांनी गुंफले आहेत– एखाद्या लेखात ते गाठीच्या चोळीबद्दल बोलतात, तर एखाद्या लेखात तिच्या डोळ्यांतल्या काजळाबद्दल बोलतात. चुंबनबनाने पुलकित झालेलं मन एखाद्या लेखात उमटतं, तर स्पर्शकमळांनी मोहरून उठलेली करकमलं एखादा लेख व्यापून टाकतात. नऊवारीतल्या, नऊवारीपलीकडच्या सौंदर्याचा वेध घेण्याचा प्रयत्न एखाद्या लेखात प्रभावीपणे जाणवतो, तर एखाद्या लेखात नऊवारीच्या आतल्या सौंदर्यालाही पराभूत करणारं वैनीच्या मनाचं सौंदर्य आपल्या धाकल्या दिराला दिपवून टाकत असतं.

या लेखांविषयी आपलं मनोगत व्यक्त करताना सुरुवातीलाच डॉ. यादवांनी असं म्हटलं आहे की, शृंगारविषयक अनुभव ललित गद्याद्वारा व्यक्त करण्याचा प्रयत्न या लेखांमधून त्यांनी केलेला आहे. त्यांचा हा प्रयत्न निश्चितच सफल झालेला आहे; पण त्याच वेळी त्यांच्या मनाने यादवांना बऱ्याच ठिकाणी फसवलेलंही आहे. म्हणजे असं की, गद्याद्वारा अनुभव व्यक्त करायला गेलेले यादव अनेक वेळा काव्यकमळामध्ये त्यांच्या नकळतच बंदिस्त झालेले आहेत. उदाहरणार्थ स्त्रीच्या डोळ्यांविषयी डॉ. यादव लिहितात–

'डोळ्यांना खोट्या खोट्या रंगातही झाकू नये. ते मुळातच खूप बोलके आणि रंगीत आहेत. रंग पाहता आले पाहिजेत एवढंच. त्यांची भाषा रंगांची असते. त्या भाषेला ध्वनी नाहीत, म्हणून ती अनेकार्थी पाकळ्यांची झाली आहे. त्यामुळे डोळ्यांत भाऊक झुंबरं रंगाळतात. नक्षी-प्रकाश पसरत राहतो. अशी भाषा प्रेमाला फार उपकारक. कारण हे पत्रातल्या शाईसारखं एकरंगी नसतं, हिरव्या माळावरल्या रंगरंगेल्या अनेक रंगी रानफुलांसारखं असतं. हे खऱ्या प्रेमिकाला माहिती आहे. डोळ्यांतून जेवढं प्रेम ओसंडतं तेवढं फक्त हृदयातच असतं. चुंबनालिंगनांच्याही पलीकडचं प्रगाढ प्रेम डोळ्यांनी देता येतं ...' किंवा 'चुंबन वन' या लेखात ते लिहितात–

'खरी चुंबने दीर्घ आणि निधास्त एकांतातच शरीरावर पिकतात. असलं चुंबन हे फुलून आलेल्या शरीरावरचं फळ असतं. शरीर फुलून आलं नाही तर चुंबन फळत नाही...शरीरालाही एकटचाला वाटेल तेव्हा फुलता येत नाही. हळुवार स्पर्शाचं पाणी त्याला घालावं लागतं...लाजरीच्या रोपट्याच्या उलट त्याची अवस्था असते. लाजरी स्पर्श झाला की लाजून पान मिटून घेते, शरीराला शरीराचा स्पर्श झाला की ते फुलून येऊ लागतं. सुगंधानं धुंद होऊ लागतं. त्याच्यातील मद उन्माद-अवस्थेला पोचतो. वस्त्रं पिकल्या पाकळ्यांसारखी गळू लागतात नि मग चुंबनं उमलू लागतात. आलिंगनं दृढ होऊ लागतात.'

डॉ. यादवांचं हे काव्य फक्त लेखातच फुलून येतं असं नाही, तर 'आकाशवेल,' 'चुंबनबन,' 'प्रिया पहाटते आहे,' 'आठवणींची साठवणी' यांसारख्या लेखांच्या निव्वळ शीर्षकांमधूनच त्याचा गंध, त्याचं अस्तित्व जाणवायला लागतं. अर्थात अशा काव्यात्मक विषयांवर लिहिताना लेखणीनंही तेच वळण घेणं स्वाभाविकच आहे.

अशा तऱ्हनं स्वत: सौंदर्याचा आस्वाद घेणारं लेखकाचं मन जाता जाता या प्रांतातील अनभिज्ञांना, नवागतांना थोडं मार्गदर्शनही करून जातं. सौंदर्याच्या, उपभोगाच्या नेमक्या जागा दाखवून जातं. 'नऊवारी' या लेखात लेखक सांगतो–

'केतकीसारखं पिवळं अंग असेल तर हिरवळीगत बारीक चौकड्यांची इरकली किंवा पांढऱ्या खडीची काळी चंद्रकळा नेसावी. नऊवारीच्या ह्या जातीत अंगाचा केवडा उठून दिसतो. लालसर गोऱ्या अंगावर फिकट गुलाबी शालू ज्यानं पाहिला असेल तो तर नऊवारीचा जन्मभर गुलाम होईल. मराठी गव्हाळ रंगाला मोगरीसारखी नऊवारी खुलून दिसते, तर जास्वंदी नऊवारी लांबट चेहऱ्याच्या कांतिमान नववधूला कोंदणात बसवून टाकते... नऊवारीत असणं म्हणजे गुलाब-फुलाच्या गेंदावर अंथरूण करून सुरक्षित झोपणं... पाकळ्या भोवती पसराव्यात तसं भोवतीचं विश्व वाटतं... निसर्गाची मग सृष्टी होते नि हिरवा शालू नेसते. गवताची हिरवळ होऊन नागमोडी वाटेनं इरकली नेसल्याचा भास होतो. गुलमोहरानं स्त्रीरूप घेऊन टोपपदर परिधान केल्यागत वाटतं. सगळी सृष्टी कामिनीगत होते नि सगळा निसर्ग पैठणी होतो.'

किंवा 'गाठीची चोळी' या लेखात डॉ. यादव सांगतात–

'...गाठीची चोळी घालताना कुणाला तरी चोरून पाहावं. विशेषत: गाठ मारताना पाहावं. पाहाता येत नसेल तर खुशाल आत्महत्या करावी. गाठीची चोळी अंगावर सोडता आली पाहिजे. ते जमत नसेल तर मग मिश्या काढून टाकाव्यात. काहीच जमत नसेल तर शेवटी गाठीची चोळी बाह्यांना झटकून उन्हात घालावी. तिच्या शितोड्यानं तोंड तुषारावं. तिचा घामट गंध मातीतल्या कस्तुरीसारखा असतो तो हुंगावा. कल्पनेतल्या नाकाला तो घेता येतो.'

किंवा 'प्रिया पहाटते आहे' या लेखात ते सांगतात–

'प्रिया अशी निर्भयपणे मनात पहाटली की, मग तिला मनाचा हळुवार आलेख पत्रातून द्यावा. एखादा एकान्त मागावा. गर्दीत प्रियेशी वाटेल त्या विषयावर गप्पा केल्या तरी चालतील. कारण तो तिथं खरा विषयच नसतो. तिथं तिचं बोलणं, तिचं हास्य ऐकत राहाणं, विविध भावावस्थांत तरंगणारे तिचे बोलके डोळे अनुभवत राहणं हा खरा विषय असतो. तो अबोलपणे अगदी आतलं मन अनुभवत असतं. एकान्तात मात्र रेशनच्या, महागाईच्या, टंचाईच्या, रॉकेल कसं मिळत नाही, घरी लोक नेहमी चहाला येऊन कसा त्रास देतात याच्या गप्पा मारू नयेत. तिथं हृदय–संवाद होऊ द्यावेत. हा संवाद सुरू व्हावा असं वाटत असेल तर डोळयांना बोलकं करावं. तिच्या तळहाताची गादी आपल्या हातात घ्यावी, ती आपल्या उबदार हातांनी दाबावी. गोंजारावी. तळव्यावरची रेषांची नाजूक वेल न्याहाळून पाहावी आणि हळूच आपल्या ओठांचं फुलपाखरू त्या वेलीवर एकदा बसू द्यावं... मग प्रिया मोगर–वेलीसारखी अबोल बहरू लागेल.

'अशा वेळी एकान्तीच्या गोष्टी मार्मिक शब्दांत बोलाव्यात. देवाला वाहताना आपण करंडीतलीही फुलं नकळत निवडतो आणि वाहतो. शब्दांची निवडही तशीच असावी... प्रियेची तीही एक पूजाच असते... गोष्टी काय बोलाव्यात ते मी सांगू नये... कुणीच कोणाला त्या सांगू नयेत. प्रियेने प्रियापाशी नि प्रियाने प्रियेपाशीच त्या सांगाव्यात. त्या गोष्टी तरल, धुंद असतात. सुगंधी श्वासांच्या असतात. गाढ, उबदार आलिंगनाच्या असतात. त्या सांगायच्या नसतात, वाचायच्या नसतात नि लिहायच्याही नसतात. कारण त्यांच्यातील धुंदी, सुगंध नि ऊब उडून जाते. शब्दार्थाची टरफलं फक्त राहतात. म्हणून त्या गोष्टी प्रत्यक्ष संवेदायच्या असतात.'

किंवा 'स्नेहसखी' या लेखात यादव लिहितात –

'मात्र ही सखी स्नेहसखीच राहावी. सप्तपदीत तिला ओढू नये. स्वतःच्या नावाचा काळा परवाना तिच्या गळयात बांधू नये. नाही तर मग अमृताची काकवी होते. सखीची कारभारीण होते आणि आपणाला संस्कृतीच्या गोठयात बांधते ..'

'आकाशवेल' हा या सर्व लेखांमध्ये अतिशय निराळया विषयावरील लेख. एक स्वर्गीय स्वर असणाऱ्या गायिकेला वाहिलेली ती शब्दफुलांची ओंजळ आहे. लेखक म्हणतो–

'......'पाकिझा'च्या वेळी गीत ऐकताना विद्ध होऊन गेलो. तुझ्या सुरावटींमुळे त्या नायिकेचा आत्मा अधिक समजला ..असा कितीजणींना तुझ्या स्वरांचे प्राण देऊन जिवंत केलं आहेस ? त्यांचा अभिनय, त्यांचा भाव उत्कट केला आहेस ! काजव्याइतकंही कधी कधी तेज नसलेल्या या नकली चित्रतारकांना तू अशीच स्वरांचे उत्कट प्राण देत हिंडतेस. एखाद्या शापित आदिशक्तीसारखी पृथ्वीवरच्या अचेतनाला स्वर्गीय चैतन्य देतेस !'

या संग्रहाला यादवांनी नाव दिलंय 'स्वर्गकमळे !' याच शीर्षकाचा एक लेखही संग्रहामध्ये समाविष्ट झालेला आहे. या लेखात श्री. यादव लिहितात –

'स्त्रीच्या हाताला कर-कमळ म्हणतात, बोटांच्या पाकळया नाजूक आणि मृदूमुलायम असतात म्हणून; पण खरं ते स्पर्श–कमळ असतं. स्पर्शासाठी जन्माला आलेलं. स्पर्श देणारं, स्पर्श घेणारं स्पर्शानं. फुलून सर्वस्वी शरण येणारं. अंगावरून हळुवार स्पर्शत हिंडणाऱ्या भ्रमराच्या चरणी सर्वस्व अर्पण करणारं. स्पर्श नसेल तर मिटणारं.'

पण या संग्रहालाही हेच नाव देण्याचं कारण काय ? कदाचित यादवांना असं तर सुचवायचं नसेल की, संग्रह उघडल्यानंतर जी कमळं तुमच्या हाती लागणार आहेत त्यांचा स्पर्श केवळ तुमच्या हातांनाच नाही तर डोळयांना, कानांना, ओठांना, नाकाला आणि एखाद्या नशिबवानाच्या हृदयालाही जाणवणार आहे ? किंबहुना हाताच्या स्पर्शाने न जाणवणारी आणि तरीही उमलत जाणारी अशी ही 'स्पर्शकमळे' आहेत ?


पण तरीदेखील या सर्व लेखांमध्ये एक लेख उगीचच डोळयात खुपतो–भरलेल्या निसर्गात उभ्या असलेल्या एखाद्या वठलेल्या वृक्षासारखा, किंवा निळया-सावळया मेघांमध्ये एकाकीच फिरत असलेल्या एखाद्या सावरीच्या ढगासारखा किंवा एखाद्या डौलदार इमारतीला बांधलेल्या काळया बाहुलीसारखा ! आणि तो लेख म्हणजे 'मुली पाहणं !' हा लेख म्हणजे कमळाच्या वनात कण्हेरीची छडी हाताला लागावी तसा मध्ये येतो. यादवांनी तोही आपल्या परीनं सजवायचा प्रयत्न केला आहे; पण तरीदेखील तो खुपल्याशिवाय राहात नाही–वाहत्या प्रवाहात मध्येच उगवलेल्या पाणथळीसारखा !

इतर बहुतेक ठिकाणी अतिशय अनुरूप रेखाटनं करणारा या पुस्तकातील चित्रकाराचा कुंचलाही 'चुंबनबन' या लेखापाशी मात्र एकदम निष्प्राण झाल्यासारखा वाटतो–एखाद्या उत्कट क्षणीच सारं चैतन्य हरपणाऱ्या शापित गंधर्वासारखा !

शेवटी एक गोष्ट स्पष्ट केलीच पाहिजे की, पुस्तकाचं परीक्षण करण्याचा इरादा या ठिकाणी नसून एका अतिशय वेगळया, तुमच्या–आमच्या मनात सतत रुंजी घालणाऱ्या विषयांवरील कलात्मक लेखांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे–तोसुद्धा बराचसा लेखकाच्याच लिखाणातून ! कारण मराठी साहित्यापुरतं बोलायचं झाल्यास Often thought but never so well expressed, असंच या लिखाणाचं स्वरूप आहे.

–सतीश कामत

**स्पर्शकमळे**
डॉ. आनंद यादव
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
पृष्ठे १३५, किंमत १२ रु.



# जागतिक बालक वर्ष : वास्तवातले - पृष्ठ १ वरून

प्रतिकारशक्तीच नाहीशी झालेली असते. सकस आहाराच्याअभावी अनेक रोग त्यांच्या शरीरात प्रवेश करतात. 'अ' जीवनसत्त्व पुरेसे न मिळाल्यामुळे आज जवळजवळ दोन कोटी मुलांची दृष्टी कमजोर होत चालली आहे. देशात दरवर्षी मुलांच्या संख्येत एक कोटीने भर पडते व त्याच अनुषंगाने मृत्यू व बालरोग्यांच्या संख्येतही तेवढीच वाढ होते असा अंदाज आहे.

मुलांमधील मृत्यूचे हे प्रचंड प्रमाण गरिबी आणि विषमतेशी संबंधित आहे. हे प्रमाण निश्चित अशा राष्ट्रव्यापी कार्यक्रमाने व वेळीच योग्य ती वैद्यकीय सेवा तत्परतेने पुरवून कमी करता येण्यासारखे आहे; पण त्यासाठी राजकीय पातळीवरील संकल्पाची आवश्यकता आहे. आपल्याकडे नेमका त्याचाच अभाव आहे.

आपल्या देशातील लोकसंख्येपैकी पंचाहत्तर टक्के लोक खेड्यात रहाणारे व त्यातलेही पंचाहत्तर टक्के लोक पूर्णपणे निरोगी नाहीत. दरवर्षी आपल्या देशातील विद्यापीठांमधून दहा हजार विद्यार्थी डॉक्टरची पदवी घेऊन बाहेर पडतात. डॉक्टर्स तयार करणारा भारत हा जगातील सर्वात मोठा देश समजला जातो. असे असूनही बहुसंख्य खेड्यांमधून वैद्यकीय सेवा मिळण्याची सोय उपलब्ध नाही. कारण खेड्यात जायचे म्हणजे डॉक्टरांना ती शिक्षाच वाटते. त्यांच्या शिक्षणावर सरकार जो खर्च करते त्यातला ऐंशी टक्के पैसा ग्रामीण आणि शेती-करातूनच मिळालेला असतो; पण त्याचा कोणी कधी विचारही करीत नाही. याचे कारणही आपले राजकीय आर्थिक धोरण ग्रामीण विकासाला प्राधान्य देणारे नाही.

या वर्षी जागतिक बालकवर्षाच्या निमित्ताने सरकारने जो कार्यक्रम घोषित केला आहे त्यात वर्षभरात दीड कोटी मुलांना 'अ' जीवनसत्त्व असलेल्या गोळ्या देण्याची एक योजना आहे आणि प्रत्यक्षात दृष्टी अधू होऊन अंधत्वाकडे जाणाऱ्या मुलांची संख्याच त्यापेक्षा दुप्पट आहे. यंत्रयुगाखाली वावरणाऱ्या देशातील योजना उचलण्याकडे आपला कल असल्यामुळेच अशा प्रकारच्या खर्चिक योजना आपण हाती घेतो. खरे म्हणजे आपल्याकडे स्वस्त व जीवनसत्त्व असलेले अन्न भरपूर प्रमाणात उत्पन्न होते. त्याचा उपयोग जरी नेहमीच्या जेवणात होऊ शकला तरी अशा गोळ्या देण्याची गरज पडणार नाही. बरे या गोळ्या आपण सगळ्यांना पुरवू शकत नाही. अशा परिस्थितीत भारतीय परिस्थितीला अनुकूल अशा व्यावहारिक गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे. शाळेतून प्रौढ शिक्षण वर्गातूनही अशा आहाराचा प्रचार करता येण्यासारखा आहे.

मुलांच्या विकासासाठी सरकारद्वारा चालवल्या जाणाऱ्या बालवाड्यांची अवस्था तर अत्यंत असमाधानकारक आहे. बालवाड्यांची रकारी पातळीवरची योजना १९७० साली सुरू झाली. आज यास बालवाड्यांमधून किती मुलांना शिक्षण मिळते त्याचे आकडे उपलब्ध नाहीत; पण हे नक्की की, बालवाड्यांमध्ये शिकायला येणारी मुलं नियमितपणे कधीच येत नाहीत. १९७३–७४ साली देशातील सहा हजार बालवाड्यांमध्ये जवळपास अडीच लाख मुलांची नावे नोंदवलेली होती. या मुलांना जो पौष्टिक आहार दिला जायचा त्यावर सरकारने त्या वर्षी एकूण सदतीस लाख रुपये खर्च केले. म्हणजेच प्रत्येक मुलामागे रोज चाळीस पैसे खर्च केले गेले. या चाळीस पैशांचाही प्रत्यक्ष आहार देताना किती योग्य उपयोग केला गेला असेल याविषयी शंकाच आहे बालवाडीतील शिक्षकांचे शिक्षणही अगदी कमी झालेले. त्यांची आर्थिक स्थितीही अत्यंत शोचनीय. कारण त्यांना मिळणारा पगार घरखर्चही न चालवता येण्याइतका. असे शिक्षक मुलांना कशीबशी अक्षरांची ओळख तेवढी करून देतात. पाठ्यपुस्तकांबद्दल तर विचारायलाच नको. उत्तर प्रदेशमधल्या एका अंकलिपीत तर चक्क 'म' मोटार मधला दिलेले. ज्या मुलांनी मोटार कधी पाहिली नाही त्यांना अशा प्रकारच्या शिक्षणातून साधे अक्षरज्ञान तरी कसे व्हावे ? बालवाड्यांची योजना नंतरच्या प्राथमिक शिक्षणाला पूरक ज्ञान मुलांना मिळावे म्हणून राबवण्यात आली; पण तो उद्देश त्यातून आजपर्यंत तरी पूर्ण झालेला नाही आणि ही योजना मुलांच्या अगदी नगण्य संख्येपर्यंतच पोहोचू शकली आहे.

प्राथमिक शिक्षणाची स्थितीही अशीच चिंताजनक आहे. पहिलीत प्रवेश घेतलेल्या मुलांपैकी पंचवीस टक्के मुलेच फक्त प्राथमिक शिक्षण पूर्ण करतात आणि या पंचवीस टक्क्यांपैकी फक्त दहा टक्के मुलं माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यापर्यंत मजल मारतात. पंचाहत्तर टक्के मुलांनी मध्येच शाळा सोडण्याचे कारण अर्थातच आर्थिक विपन्नता हेच आहे.

अपंग व मानसिक रुग्ण, मंदबुद्धी मुलांचा प्रश्नही असाच भयानक आहे. अशा मुलांची संख्या एकूण मुलांच्या संख्येच्या पाच टक्के आहे. यातील शहरात रहाणाऱ्या मुलांनाच तेवढ्या प्रशिक्षणाच्या व वैद्यकीय सोयी उपलब्ध होतात. अर्थात शहरातीलही दारिद्र्यात वाढणाऱ्या बहुसंख्य मुलांना त्या मिळत नाहीतच.

आपल्या देशात मजूर मुलांची संख्याही प्रचंड आहे. इतकी मोठी संख्या दुसऱ्या कुठल्याही देशात नाही. ही मुले शेतात किंवा घरगुती स्वरूपाच्या उद्योगधंद्यात प्रामुख्याने काम करतात. अंदाजे भारतातील तीन करोड मुले श्रम करून पैसे मिळवतात. घरच्या गरिबीमुळे त्यांना कुठे तरी, मिळेल त्या मजुरीवर काम करावेच लागते. काम करणाऱ्या या मुलांची स्थिती अगदी वाईट असते. शहरात हॉटेल-खानावळींमधून मुलेच काम करतात. या मुलांकडून सरासरी बारा ते सतरा तास काम करून घेतले जाते. दिवसभर राबल्यावरही त्यांना पगार अगदीच कमी दिला जातो. अशा प्रकारचे मुलांचे भयानक शोषण आपल्याकडे सर्रास सर्रास चालू आहे. मुलांना 'अ' चे ज्ञान होण्यापूर्वीच 'क' कामातला ची ओळख गरिबीमुळे होते. त्यामुळेच कायद्याने, घटनेने १२ वर्षांखालील मुलांचे शारीरिक, आर्थिक शोषण करण्यास मनाई असली तरी एकसष्ट टक्के जनता जिथे दारिद्र्यरेषेखाली जगत असते तिथे हे शोषण बंद होणार तरी कसे ? आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार व मध्य प्रदेश या चार प्रांतांत मजुरी करणाऱ्या मुलांची संख्या इतर प्रांतांपेक्षा जास्त आहे.

दुसरी एक तेवढीच भयंकर गोष्ट म्हणजे, आपल्या देशात दोनशे

मुलांपैकी एक मुलगा कुठल्या ना कुठल्या गुन्ह्याशी संबंधित असतो. याचाच अर्थ बालगुन्हेगारांची संख्याही अशीच प्रचंड आहे. देशातील तीन कोटी मुले रस्त्यावर, केर-कचऱ्याच्या डब्यात, गटारांपाशी पडलेले उष्टे अन्न खाऊन जगतात. स्वातंत्र्याला तीस वर्षे होऊन गेल्यानंतरचे हे आकडे आहेत. अशा परिस्थितीत आपल्या राजकीय नेत्यांना जनतेची मते मागताना शरम कशी वाटत नाही, याचेच आश्चर्य वाटते.

दलित व मागासलेल्या जातींमध्ये जन्म घेतल्यामुळे, तसेच मुलगी असल्यामुळे समान अधिकारांपासून वंचित राहणाऱ्या मुलांसाठी कुठल्याही कार्यक्रमाचा समावेश सरकारने आपल्या योजनेत केलेला नाही. याचाच अर्थ या जागतिक बालकवर्षातही ही मुले आहे, त्याच अवस्थेत खितपत पडणार. अशा मुलांचा प्रश्न फक्त आर्थिक नाही, तर त्याला सामाजिक भेदभावाचे, विषमतेचेही पदर आहेत. त्यांचा जोपर्यंत विचार केला जात नाही तोपर्यंत अशा मुलांना आशेचा किरण दिसण्याची शक्यता नाही. मग अशी कितीही वर्षे जागतिक बालकवर्ष म्हणून जाहीर केली जावोत! 'राष्ट्रीय गर्व, सुखी शिशु वर्ग' ही या वर्षीची घोषणा खरोखरच पूर्ण करायची असेल तर दारिद्र्याच्या, सामाजिक विषमतेच्या काळोखात चाचपडणाऱ्या या मुलांकडे अधिक लक्ष दिले पाहिजे व त्यांच्या उन्नतीची चळवळ सर्वच स्तरांवरून सुरू झाली पाहिजे.

—अविनाश सहस्रबुद्धे

---

'या जागतिक बालकवर्षात महाराष्ट्र शासन सतरा हजार बालवाड्या सुरू करणार आहे,' अशा नुसत्या घोषणा करून काय होणार? विधायक प्रयत्न हवेत....

# 'इनव्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट'चा ग्रामीण बालवाड्यांचा प्रयोग

१ मे— महाराष्ट्रदिन! सकाळी ९-९। ची वेळ. शिरूर नगरपालिकेच्या जुन्या इमारतीत आम्ही बसलो होतो. 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' या ट्रस्टचे सेक्रेटरी श्री. अच्युतराव आपटे, ट्रस्टच्या ग्रामीण भागातील कामाच्या आधारस्तंभ असलेल्या सौ. निर्मलाताई पुरंदरे आणि आशाताई सेठ, कोणत्याही सामाजिक संस्थेला आवश्यक असणारी व्यवहार आणि व्यावहारिकतेची सतत जोड देणारे श्री. सेठ आणि ट्रस्टच्या वतीने ग्रामीण भागात निरनिराळ्या ठिकाणी चालवण्यात येणाऱ्या बालवाड्यांच्या शिक्षिका — त्यांच्यामध्ये वाघोलीच्या विमलाताई किणीकर होत्या, शिक्रापूरच्या सरलाताई कुलकर्णी आणि संध्याताई मोकाशी होत्या, करड्याच्या ताराताई सोनवणे होत्या, करंद्याच्या नंदाताई फलटणकर होत्या, कुसुमताई पावळे होत्या आणि खुद्द शिरूर गावातल्या बालवाड्या चालवणाऱ्या कमलाताई सावळे नि वैजयंतीताई पुराणिक याही होत्या. तरीदेखील एखाद्या धंदेवाईक कंपनीच्या इयर एंडिंगच्या कार्यक्रमाचे स्वरूप या बैठकीला आले नव्हते. एकाच संस्थेचे, एकाच प्रकारचे काम ग्रामीण भागात विविध ठिकाणी जाऊन करणाऱ्या कार्यकर्त्यांचा तो एक कौटुंबिक स्वरूपाचा मेळावा होता. आज या मेळाव्यात या सर्व शिक्षिका आपापले गेल्या वर्षभरातील अनुभव, अडचणी, वेदना आणि गाऱ्हाणीही कथन करणार होत्या— घरामध्ये बोलावे तितक्या मोकळेपणाने आणि इतर सर्वजण ते ऐकणार होते— तितक्याच आपलेपणाने.

प्रथम विमलाताई किणीकरांनी त्यांच्या वाघोली येथील बालवाडीचे अनुभव सांगायला सुरुवात केली.

'सुरुवातीचा काही काळ माझ्या बालवाडीत तेरा मुलं होती. ती संख्या हळूहळू वाढत पस्तिसावर, पस्तिसावरून साठावर, साठावरून पंचाहत्तरावर आणि वर्षाअखेरीस नव्वदापर्यंत जाऊन पोचली.

'वर्षभरात बालवाडीमध्ये विविध कार्यक्रम साजरे झाले. त्यात काही मनोरंजनाचे होते, तर काही शैक्षणिक स्वरूपाचे होते. ज्यांची मुले या बालवाडीत यायला लागली होती असे पालक बालवाडीबद्दल आस्था दाखवू लागले होते; पण गावातील प्रतिष्ठित नागरिक मात्र अजूनही या उपक्रमाबद्दल उदासीनच आहेत. उदासीन म्हणजे, हा उपक्रम सुरू झाला काय, व्यवस्थित चालला काय किंवा बंद पडला काय, या मंडळींना कशाचेच सोयर-सुतक नाहीयाय. त्यातल्या त्यात एकच समाधानाची गोष्ट म्हणजे, त्यांचा याला विरोध नाही किंवा कोणत्याही प्रकारे माझी कुचंबणा होईल असे ते वागत नाहीत.

'गावामध्ये पाण्याची टंचाई मात्र फार जाणवते. त्यामुळे मी मुलांना किती जरी स्वच्छ ठेवायचं म्हटलं, अगदी स्वतः धुतलं—पुसलं तरी कुठपर्यंत? पाणीच नाही म्हटल्यावर स्वच्छता राहणार तरी किती आणि कशी?

'गावामधल्या मंदिरात जी बालवाडी भरते तिथे हरिजनांच्या मुलांना घेता येत नाही. कारण अजूनही गावावर जाती—धर्मांची पकड आहे. काही काही पालकही इतके विचित्रपणे वागतात की, त्यांचा मुलगा जर आजारपणामुळे किंवा अन्य काही कारणामुळे पंधरा दिवस शाळेत आला नसेल तर त्या दिवसांची फी का म्हणून भरायची, असा प्रश्न ते विचारतात.

'हे सगळं जरी असलं तरी हळूहळू बालवाडी गावामध्ये मूळ धरू लागलीय. निदान ज्यांची मुलं बालवाडीमध्ये येतायत त्यांना तरी बालवाडीबद्दल आस्था वाटू लागलीय.'

सुदैवाने चारच दिवसांपूर्वी विमलताईंच्या या बालवाडीचा एक कार्यक्रम पाहण्याची संधी मला मिळाली होती. मुलं भलतीच चुणचुणीत वाटली. पुण्यातल्या कोणत्याही 'सेटेड' मॉटेसरीशी स्पर्धा करील असा तो कार्यक्रम होता. आदल्याच रात्री विमलताईंनी एक नाटकही सादर केले होते. अर्थात त्यामध्ये मात्र मोठ्या मंडळींनी काम केले होते. विमलताईंचा हा उत्साह थक्क करणारा आहे.

त्यानंतर शिक्रापूरच्या सरलाताई कुलकर्णींनी आपल्या बालवाडीतील अनुभव सांगायला सुरुवात केली.

'शिक्रापूरमध्ये आधी तिथल्या ग्रामपंचायतीची बालवाडी होती; पण ती हळूहळू बंद पडत गेली. त्यानंतर आपल्या ट्रस्टतर्फे बालवाडी सुरू झाली आणि मी तिथं काम करू लागले. वाघोलीप्रमाणे इथेही ग्रामस्थ किंवा सरपंच यांच्याकडून काही सहकार्य मिळत नाहीच. त्यांच्याकडे काही तक्रार घेऊन गेलं की, नुसती आश्वासनं मिळतात; पण प्रत्यक्ष कृती कुणीच करत नाही. अर्थात हे औदासीन्य ग्रामपंचायतीची बालवाडी बंद पडली म्हणून जाणूनबुजून दाखवलं जात असेल असं वाटत नाही. मंडळींना एकूण कशातच फारसा रस नाही, हेच खरं.

'आम्हाला जागेची अडचण मात्र भासते. आहे ती जागा पुरी पडत नाही. गावातल्या नाथाच्या मंदिरात बालवाडी चालवतो, पण तिथे जात–पात या मुद्द्यावरून थोडी अडचण येतेच.

'एक मात्र या गावात चांगलं आहे की, मी राहाते त्या वाड्यातली आणि आसपासची मंडळी सज्जन आणि प्रेमळ आहेत. माझी अधूनमधून विचारपूस करणारी, अडी–अडचणीला मदतही करणारी आहेत.

'साधारणतः वर्षभरामध्ये ३०–३५ मुलं बालवाडीत नियमितपणे येत होती; पण त्यातही काहींच्या पालकांनी असमंजस वृत्ती दाखवलीच. इतर काही ठिकाणी बालवाडीतल्या मुलांना पूरक आहार दिला जातो तो तुमच्याकडे का दिला जात नाही, एवढे विचारूनच काही जण थांबत, तर काही जणांनी मात्र, पूरक आहार वगैरे काही देत नाही, मग दरमहा २ रु. फी घेता ती कशासाठी, असा व्यापारी सौदेबाजीचा सवाल करायलाही कमी केलं नाही.'

सरलाताईंच्या निवेदनाला संध्याताई मोकाशी अधून मधून पुष्टी जोडत होत्या. कारण गेले दोन–अडीच महिने त्याही या बालवाडीचे काम पहात आहेत.

करड्याला बालवाडी चालवणाऱ्या ताराबाई सोनवण्यांनी सुरुवातीलाच गावातले सहकार्य चांगलं मिळत असल्याचं सांगितलं. विशेषतः गावातल्या हायस्कूलकडून गणेशोत्सवासारख्या कार्यक्रमांसाठी फारच सहाय्य झाले.

ताराताईंनी या ठिकाणी आणखी एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. तो म्हणजे, गावातल्या स्त्रियांना त्या अधूनमधून काही तरी निमित्ताने हळदी–कुंकू आयोजित करतात. त्यामुळे सहसा एकत्र न येणाऱ्या स्त्रियांना एकत्र यायची संधी मिळू लागली. त्याचप्रमाणे परस्परपरिचय आणि स्नेह वाढू लागला. ताराताईंनी या संमेलनाचा उपयोग आणखीही उत्तम प्रकारे करून घेतला. अशा संमेलनांमधून गावातील अशिक्षित, अडाणी महिलांना बालकवर्ष म्हणजे काय, त्याचे उद्देश कोणते, त्यानिमित्ताने सुरू झालेल्या किंवा होत असलेल्या बालवाड्यांचे महत्त्व आणि उपयुक्तता याबद्दल ताराताई सोप्या भाषेत माहिती सांगू लागल्या. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक सण व उत्सव सुरू करताना स्त्रियांचा फारसा विचार केला नव्हता. महर्षी कर्व्यांनी तो केला आणि आता त्यांचाच कित्ता ताराताई गिरवीत आहेत, असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही.

तरीदेखील ताराताईंचा एक अनुभव फार महत्त्वाचा आहे. अशा तऱ्हेने हळदी–कुंकवाच्या कार्यक्रमांमधून परिचय वाढल्यामुळे गावातील स्त्रिया ताराताईंशी मोकळेपणाने बोलू लागल्या आहेत. त्यातील अनेकांची अशी अपेक्षा असते की, आपला मुलगा आता बालवाडीत जाऊ लागलाय, तेव्हा चार–आठ दिवसांतच त्याला लिहा–वाचायला आले पाहिजे. ते जर होणार नसेल तर बालवाडीत पाठवून उपयोग काय? पालकांचा बालवाडीविषयीचा हा दृष्टिकोन बदलला पाहिजे, असे ताराताईंना वाटते. म्हणूनच स्त्रियांना अशा तऱ्हेने जमवून त्यांच्यावरही 'संस्कार' करण्याचे काम ताराताई करत आहेत.

कुसुमताई पावळे या आणखी एक बालवाडी चालवणाऱ्या शिक्षिका. त्या स्वतः एस्. एस्. सी. आहेत आणि सध्या याच ट्रस्टतर्फे शिरूरला चालू असलेल्या बालवाडी चालवण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या वर्गामध्ये त्या येत आहेत. त्या स्वतः सायकलवरून सर्वत्र हिंडतात. बऱ्याच वेळा वस्तीवर जाऊन बालवाडीकरता मुले गोळा करून आणण्याचेही काम कुसुमताईंना करावे लागते, पण त्यांनी आपली चिकाटी सोडलेली नाही.

खुद्द शिरूर गावामध्येच ट्रस्टतर्फे तीन बालवाड्या चालवल्या जातात आणि त्या तीन बालवाड्यांचे काम कमलताई सावळे आणि वैजयंतीताई पुराणिक या दोघीजणी मिळून बघतात. त्यापैकी एक बालवाडी हरिजन वस्तीतच भरवली जाते. या दोघींचाही गेल्या वर्षभरातील अनुभव उत्साहवर्धक आहे. एकूण सुमारे सव्वाशे मुले


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा**
**वेगळा शोध**

**प्रभावी, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

या बालवाड्यांमधून शिकताहेत. मुलांना इतर अनेक गोष्टींबरोबरच मातीकाम, संगीत वगैरेही शिकवले जाते. बऱ्याच वेळा मुलींची वेणी–फणीही स्वतः वैजयंतीताईच करतात. अस्वच्छ मुलांना घरी जाऊन स्वच्छ होऊन यायला लावतात. गावातील प्रतिष्ठित मंडळींचेही उत्तम सहकार्य लाभत आहे. शिरूरच्या नगराध्यक्षांनी तर तिन्ही बालवाड्यांचा सर्व खर्च नगरपालिकेमार्फत करण्याची तयारी दाखवली आहे. ट्रस्टतर्फे सध्या जो प्रशिक्षणवर्ग शिरूरमध्ये चालू आहे त्यालाही नगराध्यक्षांनी हरप्रकारे सहकार्य केले आहे.

ज्याप्रमाणे करड्यामध्ये ताराताई सोनवण्यांनी हळदी-कुंकवाच्या समारंभामधून पालकांशी संपर्क प्रस्थापित केला आहे, त्याप्रमाणे शिरूरमध्ये कमलताई आणि वैजयंतीताईंनीही एक चांगला उपक्रम चालू केला आहे. या दोघीजणी वेळोवेळी 'पालकसभा' आयोजित करतात. उपस्थित पालकांपैकीच कोणाला तरी सभेचे अध्यक्ष केले जाते. सभेमध्ये बालवाडीविषयी माहिती दिली जाते. तसेच इतरही अनेक विषयांवर चर्चा केली जाते. पालकांबरोबर चांगले संबंध निर्माण होण्यासाठी, वाढण्यासाठी या 'पालक–सभां'चा फारच चांगला उपयोग होत आहे. वैजयंतीताईंचा या सर्व कार्यक्रमांमधील उत्साह वाखाणण्यासारखा आहे.

आणखी एक महत्त्वाचा अनुभव या दोन शिक्षिकांकडून ऐकायला मिळाला. हरिजन वस्तीतील मुलांची बालवाडी वस्तीतल्याच एका मंदिरामध्ये भरवली जाते. त्याला कोणाचाही आक्षेप नाहीयाय; पण हीच बालवाडी गावातल्या एखाद्या मंदिरात भरवली असती तर ग्रामस्थांचे सहकार्य मिळाले असतेच असे नाही. म्हणजे मंदिरात प्रवेश करण्याला विरोध नाही, तर आमच्या मंदिरात यांनी प्रवेश करू नये, असे या विरोधाचे स्वरूप आहे.

◻

एव्हाना दोन तास होऊन गेले होते. बऱ्याच मुद्द्यांचा ऊहापोह झाला होता. शिक्षिकांनी जे अनुभव सांगितले त्यावरून त्यांना काही प्रश्नही विचारले गेले. त्यांचीही उत्तरं त्यांनी दिली. या सर्वच चर्चेवरून ग्रामीण भागात चालवल्या जाणाऱ्या बालवाड्यांच्या संदर्भात काही सामाइक मुद्दे जाणवले.

पहिला, महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या बालवाड्यांमधून फी–वसुली फार अपुरी होते. बहुतेक ठिकाणी अपेक्षित वसुलीच्या निम्मीदेखील रक्कम गोळा होत नाही. अर्थात याचे मुख्य कारण संबंधित पालकांना बालवाडीचे मोल न कळणे हे आहे. त्याचबरोबर ऐपत असूनही पैसे न देणारे पालकही कमी नाहीत. शक्य तितके मोफत मिळवायची प्रवृत्ती यामागे प्रामुख्याने दिसून येते. अन्यथा महिना २ रु. देणे ५० टक्के पालकांनासुद्धा शक्य नसते, हे खरे वाटत नाही.

दुसरे म्हणजे, या गावांमध्ये जातिभेदाची मुळे खोलवर रुजलेली आहेत. कोवळ्या, निष्पाप मुलांपासूनच तो वाढीला लावलेला असतो. हा जातिभेद मोडून काढण्याचीही गरज आहे. अर्थात तेही काम याच ट्रस्टने किंवा बालवाड्या चालवणाऱ्या संबंधित शिक्षिकांनी करावे ही अपेक्षा गैर आहे. समाजातील इतरही सामाजिक संस्थांनी त्यासाठी पुढे आले पाहिजे.

तिसरा मुद्दा म्हणजे या भागातील जनतेमध्ये प्रचंड औदासीन्य आहे. त्यांना कशाचीच फारशी आच नाही; पण त्यांचे हे औदासीन्य नष्ट करण्याचे काम विमलताई किणीकर, ताराबाई सोनवणे, वैजयंतीताई पुराणिक यांच्यासारख्या ट्रस्टच्या शिक्षिका अतिशय प्रभावीपणे करीत आहेत आणि त्याची फळे या वर्षी जरी नाही तरी पुढील वर्षी अधिक मोठ्या प्रमाणावर दिसू लागतील अशी आशा आहे.

ग्रामीण भागांमधून चालवल्या जाणाऱ्या या बालवाड्यांना आणखीही एक अडचण भासते, ती म्हणजे जागेची आणि साधनांची. ट्रस्टतर्फे या अडचणी आर्थिक सहाय्य व इतर मार्गांनी दूर केल्या जात आहेतच; पण स्थानिक व्यक्तींनी आणि संस्थांनी यांमध्ये जर पुढाकार घेतला तर ते अधिक उपयुक्त होईल, बालवाडीला अधिक बळकटी येईल. शिरूर गावाचे उदाहरण या दृष्टीने आदर्श आहे.

बालवाड्या चालवणाऱ्या या शिक्षिकांशी बोलताना किंवा त्यांचे बोलणे ऐकताना हे जाणवत होते की, त्यांच्यामध्ये भरपूर उत्साह आहे, उमेद आहे, काही तरी नवीन घडवण्याची जिद्द आहे, आकांक्षा आहे. अनेक स्थानिक अडचणींना तोंड देत असतानाही त्या अतिशय हसतमुख आहेत, समाधानी आहेत; पण या सगळ्या पार्श्वभूमीवर त्यांना दिले जाणारे मानधन मात्र तसे अपुरे आहे. सरकारतर्फे चालवल्या जाणाऱ्या बालवाड्यांच्या शिक्षिकांना अवघे १०० रु. दिले जातात. या ट्रस्टतर्फे चालवल्या जाणाऱ्या बालवाड्यांच्या शिक्षिकांना मात्र १५० रु. दिले जातात. तरीही हा आकडा आणखी वाढवण्याची आवश्यकता आहे. अर्थात ट्रस्टला त्यांच्या काही ना काही आर्थिक मर्यादा असणारच; पण यासाठी समाजातील धनाढ्यांनी, दानशूरांनी पुढे येणे आवश्यक आहे. एका बालवाडीचा वर्षाचा खर्च साडेतीन हजारांपेक्षा जास्त होत नसावा. अशा बालवाड्या जर दत्तक घेतल्या गेल्या आणि त्यांचा वर्षाचा खर्च दिला गेला तर ट्रस्टला ते अधिक सुकर होईल. आणखी काही नवीन क्षेत्रात ट्रस्ट आपले कार्य पसरू शकेल. शहरात राहून ग्रामोद्धाराला हातभार लावण्याचा हा एक अभिनव मार्ग होऊ शकेल.

हे सगळे जरी झाले तरी शेवटी एका मुद्द्यावर सर्व चर्चा येऊन थांबते, बंदच पडते. तो म्हणजे, अशा बालवाड्या चालवण्यासाठी प्रशिक्षित शिक्षिका उपलब्ध असणे. बाकी सर्व अडचणी आर्थिक बळावर दूर करता येतील; पण प्रशिक्षित शिक्षकाचा आज असणारा तुटवडा भरून काढण्यासाठी तरी मुळातच जाऊन प्रयत्न होणे आवश्यक आहे. 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' या ट्रस्टच्या कार्यकर्त्या सौ. निर्मलाबाई पुरंदरे यांनी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केला आहे.

दोन महिन्यांपूर्वीच शिरूरमध्ये बालवाडीच्या शिक्षिकांसाठी एक सहा महिन्यांचा प्रशिक्षणवर्ग त्यांनी ट्रस्टतर्फे सुरू केला आहे. यामध्ये निरनिराळ्या ग्रामीण भागांतून आलेल्या विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. हेतू असा की, कोणत्याही गावात बालवाडी सुरू करायची झाल्यास प्रशिक्षित शिक्षिकेची आयात करावी लागू नये, तर त्या गावातीलच कोणा तरी स्त्रीने ते शिक्षण घेतलेले असावे. यामुळे सर्वांचीच फार मोठ्या प्रमाणावर सोय होणार आहे. कारण प्रशिक्षित शिक्षिका एखाद्या नव्या, अनोळखी गावात जाऊन बालवाड्या चालू करण्यास फारशा राजी नसतात. त्यांच्या त्यामध्ये अनेक अडचणीही असतात. त्यापेक्षा एखाद्या स्थानिक शिक्षिकेनेच हे

प्रशिक्षण घेतलेले असेल तर ते जास्त सोईचे होईल. कारण तिला इतर अडचणी फारशा येणार नाहीत आणि आपल्याच गावात ती एक बालवाडी उत्कृष्टपणे चालवू शकेल. याच दृष्टिकोनातून शिरूरचा हा प्रशिक्षणवर्ग चालू आहे.

'या बालकवर्षात शासन राज्यामध्ये सतरा हजार बालवाड्या सुरू करणार आहे,' अशा नुसत्या घोषणा करून काय होणार ? त्यासाठी आवश्यक असणाऱ्या इतर बाबीही पूर्ण व्हायला हव्यात. निर्मलाबाईंची त्यासाठीच धडपड चालू आहे. कुठे तरी मुळालाच हात घालून या समस्येची उकल करण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे.

हा सबंधच दिवस फार चांगला गेला. अच्युतरावांचा नर्म विनोद श्री. व सौ. सेठ यांचा उत्साहपूर्ण सहभाग, निर्मलाताई आणि इतर शिक्षिका-कार्यकर्त्या यांची काम करण्याची उमेद, घडाडी सगळेच अतिशय आनंददायक होते. तरीदेखील एक लहानशीच गोष्ट माझ्यासारख्या सामान्य माणसाला जाणवली. ती म्हणजे, हे सर्वच लोक कामाच्या धुंदीमध्ये स्वतःच्या पोटाची फार आबाळ करत असतात. हे योग्य नाही. शेवटी सैन्यदेखील पोटावर चालते, हे विसरून कसे चालेल ?

— माणूस प्रतिनिधी

रंगभूमी । विनया खडपेकर

# बेकेट

निरंजननिर्मित 'बेकेट' हे नाटक ज्यॉं अनुई यांच्या फ्रेंच नाटकाचा अनुवाद आहे. अनुवादक आहेत श्री. वि. वा. शिरवाडकर. हा अनुवाद श्री. वि. वि. शिरवाडकर यांनी सुमारे पाच वर्षांपूर्वीच केला आहे आणि त्यानंतर या नाटकाचे काही प्रयोगही झाले होते. आता निरंजन या संस्थेने नवीन कलाकार घेऊन हे नाटक पुन्हा सुरू केले आहे. या नाटकाचा दुसरा प्रयोग दि. १४ एप्रिल या दिवशी दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात झाला. पूर्वीचा प्रयोग मी पाहिला नाही, तेव्हा त्या दृष्टीने तुलना होऊ शकत नाही.

इंग्लंडच्या इतिहासात बाराव्या शतकात होऊन गेलेली 'बेकेट' ही ऐतिहासिक व्यक्ती आहे. बेकेट नॉर्मन होता की सॅक्सन होता यासंबंधी इतिहासकारांत मतैक्य नाही. ज्यॉं अनुईंनी त्याला सॅक्सन दाखविले आहे. अर्थात अनुवादकांनीही त्याला सॅक्सन दाखविला आहे. ऐतिहासिक चरित्र किंवा अनुवाद या दृष्टीने न पाहता 'बेकेट' ही एक स्वतंत्र कलाकृती एवढ्याच दृष्टीने या नाटकाचा विचार येथे करीत आहे. 'निरंजन' निर्मित 'बेकेट' या नाटकाचे दिग्दर्शक आहेत श्री. अरुण होर्णेकर.

नॉर्मन राजा हेन्री आणि त्याचा सॅक्सन मित्र-सरदार बेकेट यांच्या स्नेहाची आणि दुराव्याची ही कथा आहे

नॉर्मन जेते आहेत. सॅक्सन जित आहेत. बेकेटच्या पित्याने नॉर्मन लोकांशी सहकार्याचा करार केला आहे. यामुळेच बेकेट ऐषारामात आहे. नॉर्मन राजाचा तो अतिशय विश्वासू सरदार आहे. केवळ राजा आणि त्याचा विश्वासू सरदार एवढेच त्यांचे मर्यादित नाते नाही. त्यांचा दाट स्नेह आहे. सर्व सुखोपभोगात ते एकमेकांचे साथीदार आहेत. राजा सर्व सुखोपभोगात आकंठ बुडाला आहे. मात्र मदिरा-मदिराक्षी-सगळी मौजमजा करून बेकेट आतून कुठे तरी अलिप्त आहे. त्यात बुडालेला नाही. राजाशी तो एकनिष्ठ आहे; पण राजा हे बेकेटचे सर्वस्व नाही. बेकेट हे मात्र राजाचे सर्वस्व आहे. बेकेटची अलिप्तता राजाला अधूनमधून जाणवते. तो तसे बोलूनही दाखवतो. त्याच्याशी वाद प्रतिवाद करतो. त्याला बौद्धिक शह देणे राजाला आवडते. मात्र राजाच्या मनातली स्नेहमिश्रित स्पर्धा बेकेटला सुखवू किंवा दुखवू शकत नाही. ती त्याच्या जमेसच नाही. स्पर्धा, हेवा-दावा या मानवी भावनांपासून बेकेट तसा दूरच आहे. राजा बेकेटला चॅन्सलरपद देऊ करतो, आर्चबिशपपद देऊ करतो तेव्हा बेकेट अति आनंदित होत नाही. तो शांतच असतो. राजा बेकेटकडे त्याच्या रखेली-प्रेयसीची मागणी करतो तेव्हा बेकेट क्षणभर स्तंभित होतो; पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी तो अगदी स्थितप्रज्ञतेने आपली रखेली राजाला देऊ करतो. आर्चबिशपचे पद राजाने देऊ केल्यावर बेकेट सांगतो, 'हे पद स्वीकारल्यावर आपली मैत्री कठीण जाईल.' पण राजाला ते पटत नाही. ते पद स्वीकारण्यास तो बेकेटला भाग पाडतो. बेकेट आर्चबिशप झाल्यावर दोघांत संघर्ष सुरू होतात. बेकेटचा आंतरिक सूर चर्चच्या कामाशी जुळतो. बेकेट राजाच्या मताप्रमाणे वागत नाही. राजाच्या राण्या, सबूदार बेकेटसारख्या लुच्च्याला असे चढवून ठेवल्याबद्दल राजाला दोष देऊ लागतात. राजाला हे पटत नाही. तो पुनःपुन्हा बेकेटशी तडजोड करू पाहतो. तडजोड होत नाही. अखेर राजा बेकेटचा खून करवितो; पण शेवटी पश्चात्तापदग्ध होऊन त्याच्या थडग्याजवळ क्षमा मागतो.

राजा आणि बेकेट यांच्या स्नेहाला युरोपमधील चर्च आणि राजसत्ता यातील संघर्षाची पार्श्वभूमी आहे. ही पार्श्वभूमी राजा आणि बेकेट यांच्या स्नेहाचे चित्र यात आंतरिक एकता आहे. त्यामुळे एकदा या मैत्रीचे चित्र आणि एकदा चर्च–राजसत्ता या तुकड्यातुकड्यांचे नाटक बनविले आहे असे वाटत नाही. आजकाल निरनिराळ्या दृश्यातील आंतरिक एकता नाटकात फार कमी आढळते म्हणून तिचा आवर्जून उल्लेख आवश्यक वाटतो. नाट्यविषयाचा लेखकाने खूप खोलवर जाऊन ठाव घेतला आहे असे मात्र वाटत नाही. असो.

बुद्धीला, भावनेला साद घालणारी अशी कथावस्तू केवळ रोमहर्षक आहे. तरीही

नाटक अतिशय कंटाळवाणे झाले. याचे कारण नाटकाचा सुमार प्रयोग. नाटक सादर करणाऱ्या कलावंतांना स्वतःच्या भूमिकेचे अंतरंग समजले आहे असे वाटत नव्हते. पाठ केलेले संवाद कोरडया चेहऱ्यांनी सगळेजण उच्चारीत होते. श्री. अरुण होर्णेकर ( राजा ) काही वाक्ये खूप मोठ्याने, काही वाक्ये अगदी हळू म्हणत होते. त्यांच्या शब्दांना अपेक्षित वजन येत नव्हते. कामांध, स्वार्थी, बेकेटवर प्रेम करणारे असे राजाचे विविधरंगी व्यक्तिमत्त्व साकार होत नव्हते. श्री. रवी पटवर्धन ( बेकेट ) यांनी बेकेटचा अलिप्तपणा दाखविण्यासाठी चेहरा भावनाहीन, मख्ख ठेवला होता. त्यातून बेकेटच्या अलिप्त तरीही उत्कट, कर्तव्यदक्ष परंतु दयाळू अशा वृत्तींचे दर्शन होऊ शकत नव्हते.

दीपक शिर्के, संजय विद्वांस, प्रदीप नरवणे, दिलीप गुजर ( सरदार ), अजित म्हात्रे ( ऑसक्फर्ड ), दिलीप नाईक ( यॉर्क ), अनिल सासवडकर ( भिक्षू ), विनय जोशी ( लुई ), श्रीराम दाते ( फॉलिएट ), विवेक पणशीकर ( छोटा भिक्षू ) मुकुंद टांकसाळे ( आर्चबिशप ), मदन बाग्रवनकर ( बिशप ) सतीश भागवत ( माणूस ), निरंजन पटवर्धन ( धाकटा मुलगा ), नितीन केसकर (थोरला मुलगा ), अपर्णा देव ( ग्वेंडोलेन ), तृप्ती राणे ( थोरली राणी ), माधवी माऊसकर ( धाकटी राणी ) या इतर कलाकारांना वाव कमी आहे. त्यांनी आपल्या भूमिका ठीक सांभाळल्या आहेत.

रंगभूषा, वेषभूषा, केशभूषा यात मात्र पात्रांच्या व्यक्तिमत्त्वांचे आणि काळाचे उचित भान योजकांनी ठेवले आहे. डॉ. गजानन गानू यांचे पार्श्वसंगीत दृश्याला अनुसरून आहे.

लेखनात ठीक असले तरी प्रयोगात उणे असल्यामुळे कंटाळवाणे होणारे नाटक आहे.

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# तेरे प्यार में

## झकास फार्सचा मनसोक्त चित्रचुथडा

कोणतीही दुसऱ्या भाषेतील कलाकृती अनुवादित करताना अनुवादक हा स्वभाषा व अन्य भाषा या दोन्हीमध्ये चांगली गती असणारा असावा लागतो. विशेषतः मूळ कलाकृती ही केवळ भाषाच नव्हे; तर वातावरण, संस्कृती इत्यादी दृष्टींनीही भिन्न असेल, तर अनुवादाची कामगिरी अधिक अवघड बनते. एक तर सर्वच बाबतीत मूळ कृतीशी प्रामाणिक राहून एक चांगले भाषांतर असे त्या कृतीचे स्वरूप ठेवावे लागते किंवा दुसरा पर्याय (हा प्रकार नाटक, चित्रपट अशा प्रयोगक्षम कलाकृतींबाबत जास्त स्वीकारावा लागतो. ) म्हणजे मूळ कलाकृतीचा प्राण तसाच ठेवून बाकी साज मात्र आपल्या वातावरणाचा चढवायचा. जर हा रूपांतरकर्ता समर्थ नसेल तर मात्र या सगळ्या जुना साज काढून नवीन साज चढविण्याच्या प्रक्रियेत एखादे विचित्र, हास्यास्पद धेडगुजरी सोंग निर्माण होण्याचीच शक्यता जास्त.

कलाकृती जेवढी प्रसिद्ध, तेवढे विविध भाषांत अनुवाद होण्याचे सन्मान तिच्या वाट्याला जास्त; पण त्याचबरोबर तऱ्हेतऱ्हेची चित्रविचित्र रूपे घ्यावी लागण्याचा धोकाही जास्त. ब्रॅंडन थॉमस यांनी लिहिलेले 'चार्लीज् आँट ' हे नाटक इ. स. १८९२ मध्ये लंडनमध्ये प्रथम रंगभूमीवर आले आणि प्रचंड गाजले. अनेक भाषांमध्ये प्रवेश करून ते रंगभूमीवर व रुपेरी पडद्यावर साकार झाले. आचार्य अत्र्यांनी ' मोरूची मावशी ' या नावाने ते मराठी रुपेरी पडद्यावर आणि नंतर मराठी रंगभूमीवर झळकवले. आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यावर अत्र्यांनी या इंग्रजी आँटला संपूर्णतः मराठी मावशी बनवून टाकले आहे. याच 'चार्लीज् आँट 'चे हिंदी चित्ररूपांतर ' तेरे प्यार में ' या नावाने नुकतेच प्रदर्शित झाले.

संपूर्णतः नखशिखांत विनोदी वा संपूर्णतः रहस्यमय अथवा असेच पहिल्या क्षणापासून शेवटच्या क्षणापर्यंत एकाच रसात न्हाऊन काढणारे काही असू शकते, याची कल्पनासुद्धा नसल्यामुळे ' तेरे प्यार में 'मध्ये मूळच्या भन्नाट विनोदी कथानकाला अनेक भावनोत्कट प्रसंगांची व एका उदास गाण्याची ठिगळे जोडली आहेत. तऱ्हेतऱ्हेच्या चमत्कारिक युक्त्या योजून अत्यंत ठोकळेबाज प्रणयप्रसंगांची लक्तरे जोडली आहेत.

' मोरूची मावशी 'चे कथानक बहुतेकांना माहीत असल्याने ' तेरे प्यार में 'च्या निमित्ताने ते पुन्हा सांगण्याचा गैरफायदा मी घेत नाही. तर यातील दोन कॉलेजकुमार ( शेखर व आकाश—अनुक्रमे, मिथुन चक्रवर्ती व विजयेंद्र) आणि कॉलेजातील त्यांच्या लाइनी ( अनुक्रमे, सीमा व अंजू—सारिका व श्यामली ) यांची बागेत बागडताना चालणारी गाणी, शेखरचे बाबा रायबहादुर केदारनाथ ( इफ्तेकार ) आणि आकाशाची मावशी—खरी राणी ( नादिया ) यांचे जुने प्रेम, त्यामुळे पुनर्मीलनाच्या वेळी दोघांचीही हृदये भरून येण्याचा सोहळा, त्याचप्रमाणे मावशीचे सोंग घेतलेला विचित्रसिंग (पेंटल) आणि त्याची प्रेयसी (आभा धुलिया) यांची भेट, त्याआधीचे हृदयपिळवटक गाणे या सर्व भरलेल्या मसाल्यामुळे चित्रपटातील विनोदाचे पार भरीत झाले ! हे प्रकार वगळूनही चित्रपटातील विनोदाचा दर्जा फुटकळ व फालतूपणाच्या पातळीपलीकडे फिरकत नव्हता, ही गोष्ट वेगळी.

पात्रांची नावे चमत्कारिक ठेवल्याने विनोदनिर्मिती होते, असे बहुधा ' तेरे प्यार में 'च्या पटकथाकारांना कोणी तरी सांगितले

असावे; पण त्यासाठी त्या चमत्कारिक नावांचा काही तरी गंमतीदार उपयोग आवश्यक आहे अथवा त्यातून गमतीदार अर्थ ध्वनित व्हायला हवा, ही गोष्ट ते सोयिस्कररीत्या विसरले. त्यामुळेच विचित्र-सिंग, फौजदारसिंग कोतवाल इत्यादी चमत्कारिक नावे म्हणजे विनोदाची निष्कारण खेचाखेच होते. चित्रपटातील मुलाखतीसाठी चटावलेला पत्रकार आणि कोंबड्या पाळणारा शेजारी या दोघांशी संबंधित सर्व प्रसंग म्हणजे असाच विनोदा-साठी चाललेला आटापिटा आहे. या सर्व खोगीरभरतीला जागा देण्याच्या भानगडीत मूळ कथा अत्यंत लहानशा कोपऱ्यात अंग चोरून बसते आणि त्यामुळेच प्रभावहीन बनते.

कथेच्या बाबतीत ही भावनांची सर-मिसळ, तर संपूर्ण चित्रपटाची हाताळणीही (वा मांडणी) अत्यंत रुक्ष आहे. अत्यंत भन्नाट व स्वैर प्रसंगांच्या साखळीतून आकार घेणारा हा फार्स. फार्सिकल चित्रपटाला पात्रांच्या गमतीदार हालचाली, रचना (composition), त्यांची एकमेकांशी असलेला वा काही वेळा नसलेलाही समन्वय (co-ordinations), त्यातून मिळणाऱ्या अपेक्षित वा अनपेक्षित प्रतिक्रिया वा प्रति-साद आणि या सगळ्याला फार्समध्ये अस-णारा वेग व चटपटीतपणा याचा मागमूसही पात्रांमध्ये नव्हता. अपवाद फक्त पेंटल आणि मदनपुरीचा. (मदनपुरीने फौजदारसिंगची—सीमाचे वडील व अंजूचे काका—भूमिका केली आहे.) फार्सची नस ओळखून त्याप्रमाणे या दोघांनीच अभिनय केला आहे. संपूर्ण चित्रपटात मागे उल्लेखिलेल्या फापटपसाऱ्या-मध्ये मूळ कथेला मिळालेल्या सूक्ष्मदर्शित जागेमुळे पात्रांच्या व्यक्तिरेखा स्पष्ट करणे हा भाग नाहीच, त्यात पेंटल व मदनपुरी वगळता बाकी पात्रे म्हणजे भलतीच 'छ' दर्जाची होती. इफ्तेकार हा कायम पोलिस-कमिशनरच वाटतो. चित्रपटाचा एकूण ढंग विनोदी असल्याचे त्याने शेवटपर्यंत मनावर घेतले नाही. सारिका व श्यामलीला काहीही काम वा वाव नाही. राहता राहिले मिथुन चक्रवर्ती, विजयेंद्र व त्यांच्या नोकराचे काम केलेला नट. या तिघांऐवजी लाकडी ठोकळे वा नर्मदेतील गोटे ठेवले असते, तरी त्यांनी जरा बरा अभिनय केला असता. कोळशाने घासलेल्या पाटीसारखा स्वच्छ कोरा चेहरा ठेवणे किंवा मग तोंडे वेडीवाकडी करणे, कुठल्या तरी बेसूर पट्टीत सतत एकसुरी बोलत राहणे असे काम करण्यासाठी फारसे श्रम पडत नाहीत. (विजयेंद्रच्या बाबतीत जाणवलेली आणखी एक गोष्ट— 'चितचोर' वा 'सुनयना'सारख्या गंभीर भूमिका त्याला साजून दिसतात; पण त्यापेक्षा वेगळ्या—मग त्या विनोदी असोत वा केवळ स्टायली मारण्याची हिरोगिरी असो—भूमिकांमध्ये तो भुईसपाट होतो.)

संपूर्ण चित्रपटात कॅमेरानामक गोष्टीचा वापर इतक्या भिकार पद्धतीने केला होता की, चित्रपटापेक्षा किती तरी अधिक मर्यादा असलेले नाटकही जास्त विविधतापूर्ण वाटावे.


अभिनय, हालचाली यांमधून जर विनोद दाखवता येत नसेल, तर मग विनोदी संवादांमधून तो ऐकवावा तरी; पण अत्यंत भिकार संवादांच्या मदतीने व त्यातून भिकार रीतीने ते पडद्यावर पेश करण्याच्या पद्धतीने 'तेरे प्यार में'ने हीही अपेक्षा हाणून पाडली.

एकूणच एका झकास फार्सचा मनसोक्त चुथडा म्हणजे 'तेरे प्यार में.'

*

---


## हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
## राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे**

# बातों बातों में

दृश्य १ ले

एक होती ती.

दृश्य २ रे

तिचे एक घर. त्या घरात तिची 'माझी' माणसे.

दृश्य ३ रे

एक होता तो.

दृश्य ४ थे

त्याचे एक घर. त्या घरात त्याची 'माझी' माणसे.

दृश्य ५ वे

ती घरून निघते, कुठे तरी जाते.

दृश्य ६ वे

तो घरून निघतो, कुठे तरी जातो.

दृश्य ७ वे

दोघेही आपापल्या घरून निघतात, कुठे तरी जात असतात, वाटेत दोघेही एकमेकांना भेटतात.

दृश्य ८ अ ते ८ पी

दोघेही एकमेकांना भेटत राहतात, गप्पा मारतात. (मागे गीत—

'सुनिये, कहिये, कहिये, सुनिये—'

गीताच्या वेळी पहिल्या 'सुनिये'ला पडद्यावर तो, पहिल्या 'कहिये'ला पडद्यावर ती, दुसऱ्या 'कहिये'ला पडद्यावर ती, 'सुनिये'ला तो. contd)

दृश्य ९

तो तिच्या घरी.

दृश्य १० अ ते १० जे

तो तिच्या घरी वारंवार.

दृश्य ११

तिचा काही तरी गैरसमज.

दृश्य १२ अ आणि १२ ब

तिच्या गैरसमजाला लिम्कामध्ये बुडविणे

दोघांनी हे बुडविणे चित्रपटास जाऊन साजरे करणे.

दृश्य १३

त्याला तिच्या 'माझ्या' माणसांबद्दल तिटकारा.

दृश्य १४

त्याला त्याच्या काही 'माझ्या' माणसांकडून विरोध.

दृश्य १५

त्याच्या व तिच्यात दुरावा. (मागे गीत— कहाँ तक ये गम के अंधेरे रहेंगे—')

दृश्य १६

'हा दुरावा का?' याबद्दल तो व ती यांची शिखरपरिषद.

प्रत्येकाला 'माझ्या' माणसांबद्दल असलेल्या आपुलकीने हा दुरावा. असा निष्कर्ष.

दोघांचा निर्णय—'चला, आपण आपापल्या 'माझ्या' माणसांना 'आपली' माणसे बनवून टाकू.'

दृश्य १७

एक ग्रुप फोटो.

'एक होता तो आणि एक होती ती. मग दोघांचे प्रेम जमले.' या दीड-दोन ओळींच्या कथेला अक्षराअक्षराला नीट फोडून आणि मग प्रत्येक ठिकाणी एकेक किस्सा चुटका घुसवून एक तेरा—चौदा रिळांच्या चित्रपटाला पुरेल एवढी पटकथा बनविण्याची बासू चटर्जींची हातोटी 'बातों बातों में'मध्ये अतिशय छान प्रत्ययाला येते.

यातील बहुतेक सर्वच चुटक्यांची निवड आणि ते चुटके पडद्यावर मांडण्याची बासू चटर्जींची खुमासदार शैली हे आणि हेच त्यांच्या चित्रपटांचे वैशिष्ट्य बनून गेले आहे. पडद्यावरील कलाकारांच्या कमीअधिक ताकदीनुसार मग बासू चटर्जींचा चित्रपट कमी-अधिक रंगतो, आवडतो. मग कधी हे सगळे दाखविण्यासाठी पार्शी वातावरण दाखविणे नाही तर 'बातों बातों में'-प्रमाणे ख्रिस्ती 'तो—ती' दाखविणे अशा बारीकसारीक युक्त्या बासूदा हल्ली वेगळेपणा उभा करण्यासाठी योजत असतात. ज्या मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व बासूदांची पात्रे करतात, त्या मध्यमवर्गीयांची मिश्किल फिरकी घेणारे मर्यादित चावट प्रसंग, त्यांच्या भावना थोड्याफार हलविणारी मर्यादित संकटे, स्वतःच उभे केलेले पेच आणि मध्यमवर्गीयांना नेहमीच हवा असणारा आणि सुखविणारा सुखांत ही बासूदांच्या बहुतेक सर्वच चित्रपटांमध्ये असलेली लक्षणे अर्थातच 'बातों बातों में'मध्येही आहेतच.

या सगळ्यामध्ये प्रेक्षकाला तर्कशुद्ध काटेकोरपणा अपेक्षित नसतो तर एक सुसंगत सहजता हवी असते, घटनांमधून एखादी व्यक्तिरेखा ठाशीव करणे याला प्राधान्य न उरता पडद्यावरील पात्रांच्या व्यक्तिमत्त्वातील काही ठराविक पैलूंमुळे लागोपाठ घडणाऱ्या गमतीदार घटनांना महत्त्व येते आणि हे दोन्ही दृष्टिकोन डोळ्यांपुढे ठेवूनच बासूदांनी संपूर्ण पटकथेची रचना केलेली असते. या सगळ्या खेळकरपणाला आवश्यक असणाऱ्या तितक्याच खेळकर पण खटकेबाज संवादांची जोडही बासूदा आवर्जून देतात, हीही बासूदांच्या चित्रपटांची वैशिष्टचे 'बातों बातों में'मध्ये आहेतच.

मी आधी म्हटल्याप्रमाणे 'बातों बातों में' रंगविण्यात कलाकारांचा— मुख्यतः अमोल पालेकर, पर्ल पदमसी आणि रणजित चौधरी— वाटा फार मोठा आहे. टीना मुनीमचे अभिनयाशिवाय फक्त दिसणेसुद्धा अतिशय प्रसन्न व प्रेक्षणीय आहे.

चित्रपटात एकूण चारच गीते आहेत; पण ती गीते संगीताच्या दृष्टीने तर सुरेख बांधली आहेतच; पण त्यांची योजनाही छान झाली आहे. 'ना बोले तुम ना मैंने कुछ कहा' आणि 'उठे सबके कदम, देखो रं पं पं' ही दोन्ही गीते ठेक्याची, त्यांच्या तालाला महत्त्व असणारी गीते. ती दोन्ही गीते सरळ पडद्यावरील पात्रांच्या तोंडी टाकली आहेत. त्यांच्या अतिशय आकर्षक तालामुळे ती सहजगत्या प्रेक्षकांना भुरळ पाडतातच. अन्य दोन गीते— 'सुनिये, कहिये' आणि 'कहाँ तक ये गम के' क्वचित बोअर होणारी; पण पडद्यावर घडणाऱ्या प्रसंगांच्या तुकड्यांच्या पार्श्वभूमीवर ती येतात. साहजिकच फटाफट बदलणारे हे तुकडेही प्रेक्षकाला आकर्षून घेतातच. चित्रपटातील कित्येक प्रसंगांमध्ये रणजित चौधरीच्या हातातील व्हायोलिनच्या तुकड्यांचा केलेला उपयोगही अतिशय भन्नाट व डोकेबाज.

बासू चटर्जींची ठराविक हाताळणी, काही कलाकारांच्या वाट्याला आलेल्या ठराविक व्यक्तिरेखा, राजेश रोशनचे आपली सर्व वैशिष्टचे जपणारे संगीत अशा बऱ्याच मर्यादा असलेल्या गोष्टी एकत्र येऊनही त्या चित्रपटभर परस्पर पूरक ठरल्याने 'बातों बातों में' चांगलाच रंजक ठरला आहे. □



विवाह, वाढदिवस, परीक्षेतील सुयश... अशासारख्या आनंदाच्या प्रसंगी आमचे गिफ्ट चेक्स उपयोगात आणा... आकर्षक डिझाईनचे... रु.५, रु. १०, रु. २५ अशा रकमांचे ... सहज खरेदी करता येणारे व कमिशनशिवाय वटविता येणारे ... देणाऱ्याचा व स्वीकारणाऱ्याचा आनंद शतगुणित करणारे ।

तपशीलासाठी आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

बँक ऑफ महाराष्ट्र
( भारत सरकारचा उपक्रम )
मुख्य कार्यालयः
लोकमंगल, पुणे ४११ ००५

**मोरपिसासारख्या आठवणी ... महाबँकेचे गिफ्ट चेक्स हेहि त्यांचेच प्रतीक !**

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा

PRATIBHA 79-17